# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०१७ / अग्रहायण २१, १९३९ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) गृहनिर्माण मंत्री**<br>**(३) कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७५**

---

### देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) शहर व परिसरामध्ये अवैध दारु विक्री होत असल्याबाबत

**(१) * ९८६५७ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगांवराजा शहर व परिसरामध्ये अवैध दारु विक्री व अन्य अवैध व्यवसाय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील ग्राम जवळखेड या गावातील महिलांनी तेथील अवैध दारु विक्रीबाबत अनेकदा पोलीस स्टेशनला तक्रारी देऊनही याबाबत कारवाई न झाल्याने त्यांनी मा.मुख्यमंत्री यांची भेट घेऊन उपोषणाला बसण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) ग्राम जवळखेड या गावातील महिलांनी तेथील अवैध दारू विक्रीबाबत अनेकदा पोलीस स्टेशनला तक्रारी देऊनही याबाबत कारवाई न झाल्याने त्यांनी मा.मुख्यमंत्री यांची भेट घेऊन उपोषणाला बसण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे याबाबत अभिलेखामध्ये नोंद नाही. तथापि ग्राम जवळखेड येथील महिलांनी दिनांक १०.९.२०१७ व दिनांक १६.९.२०१७ रोजी पोलीस स्टेशन देऊळगावराजा येथे ग्राम जवळखेड येथील अवैध दारू विक्री करणाऱ्या ५ व्यक्तीविरोधात सामुहीक लेखी तक्रार अर्ज दिला आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशीत ग्राम जवळखेड येथील महिलांच्या तक्रार अर्जातील नमुद ५ व्यक्तींवर कलम १०७, ११६ (३) जा.फौ. प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.

तसेच देऊळगाव राजा व परिसरात अवैध दारू बाळगणारे व वाहतूक करणारे तसेच जुगार खेळणाऱ्या इसमांवर खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.

| अ.क्र. | हेड प्रकार | केसेस | आरोपी | जप्तमाल (रू) |
|---|---|---|---|---|
| १ | दारूबंदी | १४४ | १४९ | १२,६६,७२४/- |
| २ | जुगार | १६ | ४२ | १,६१,२५०/- |

| अ.क्र. | हेड | दाखल केसेस |
|---|---|---|
| १. | क. ९३ मुप्रोका | ५३ |
| २. | क.११० जाफौ | २० |
| ३. | क. ५६ (१), अ,ब मुपोका | ०७ |
| ४. | क. १०७,११६ (३) जाफौ | ३०३ |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई क्षेत्रामधील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामासंबंधित मागण्यांचा अधिसूचनेत अंतर्भाव करण्याबाबत

**(२) * ९५०१५ श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रातील सन २०१५ अखेर पर्यंतचे अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासंबंधीची अधिसूचना शासनाने दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास प्रसिद्ध केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची अनधिकृत बांधकामे नियमित करताना त्यात काही अटी व शर्ती घालण्यात आलेल्या असून नवी मुंबई क्षेत्रामधील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामाबाबत शासनास सादर केलेल्या मागण्यांचा सदर अधिसूचनेत अंतर्भाव करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई क्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांचा अंतर्भाव करून सुधारित अधिसूचना प्रसिद्ध करण्यात यावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) ते (५) अशी बाब नाही.

अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून प्रशमित करण्याचे नियम हे राज्यस्तरावरील असून यासंदर्भाने प्राप्त सूचना / हरकती विचारात घेवून ते शासनाने दिनांक ०७/१०/२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये अंतिम केलेले आहेत.

सिडको व नवी मुंबई क्षेत्रामधील गावठाण व विस्तारीत गावठाण क्षेत्राचा विकास हा नागरी नुतनीकरण योजनेच्या (Cluster Development)

माध्यमातून करणेचा निर्णय शासनाने यापूर्वी घेतलेला असून संबंधित नियोजन प्राधिकरणांच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम-३७ (१अेअे) अन्वये फेरबदल प्रस्तावित असून, नागरिकांच्या सूचना / हरकती मागविणारी सूचना दोन्ही प्राधिकरणाकरीता स्वतंत्रपणे दि.०४/०३/२०१४ रोजी प्रसिध्द केलेली आहे. त्यामध्ये प्रकल्पबाधितांच्या अधिकृत तसेच अनधिकृत बांधकामांचाही समावेश आहे. याबाबत वैधानिक कार्यवाही पूर्ण झालेली आहे. मा.उच्च न्यायालयामधील जनहित याचिका क्र.६१/२०१४ निकाली निघालेली असून यासंदर्भात अंतिम निर्णय घेणेस असलेला प्रतिबंध राहिलेला नसल्याने याबाबत लवकरच अंतिम निर्णय संकल्पित आहे.

-----------------

## म्हाडाचे बनावट दस्तऐवज बनवून गरजू व्यक्तींची दलालांकडून होत असलेली फसवणूक

**(३) * ९७७३९ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणामधून (म्हाडा) आमदार कोट्यातून कमी किंमतीत सदनिका मिळवून देण्याचे आमिष दाखवून म्हाडातील दलालांनी म्हाडाचे बनावट दस्तऐवज बनवून त्याआधारे गरजूंची रुपये २ कोटी ४० लाखांची फसवणूक केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

तथापि, याबाबत पोलीस उपनिरीक्षक, साकीनाका पोलीस स्टेशन, मुंबई यांच्या दिनांक ०७.०९.२०१७ रोजीच्या पत्रानुसार श्री.सुरेश टाके यांना गैरअर्जदाराने म्हाडाची रूम मिळवून देतो असे सांगून त्यांना म्हाडाच्या कार्यालयात नेऊन त्यांची म्हाडाचा लोगो असलेल्या कागदपत्रावर सह्या घेऊन, ती कागदपत्रे देऊन त्यांची फसवणूक केली असल्याचे नमूद केले आहे.

(२) तथापि, याबाबत साकीनाका पोलीस स्टेशन, मुंबई येथे दाखल तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु होईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेने शासनाकडून मंजूर निधी विनियोगाअभावी परत केल्याबाबत

**(४) * ९८६४६ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेतील बी.एस.यु.पी. योजनेसाठी शासनाकडून रूपये ३२ कोटी इतका निधी मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत सफाई कामगारांसाठी गृहसंकुल उभारण्याकरिता शासनाने रूपये १२ कोटी इतका निधी मंजुर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही योजना निर्धारित मुदतीत पूर्ण न झाल्याने शासनाने निधी व्याजासह परत करण्याचे आदेश महानगरपालिकेस दिल्याची बाब माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या महत्वपुर्ण योजनांकरिता शासनाकडून मिळणाऱ्या निधीचा विनियोग महानगरपालिकेने न केल्यामुळे संबंधीत दोषी अधिकारी / कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) शहरातील गरीबांसाठी मुलभूत सुविधा पुरविणे (बी.एस.यु.पी.) या योजनेअंतर्गत राहुलनगर व वाल्मिकी वसाहत या दोन वस्त्यांचे एकूण ६०० घरकुलांकरिता रु.३५.३८ कोटी रकमेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास दिनांक २९.१२.२००८ रोजी राज्यस्तरीय सुकाणू समितीकडून मंजुरी प्राप्त झाली व दिनांक ०३.०२.२००९ रोजी केंद्रस्तरीय सुकाणू समितीची मंजूरी प्राप्त झाली आहे.

(२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेअंतर्गत १२८ सफाई कामगारांसाठी घरकुल देण्याचा रु.१२ कोटी निधीचा प्रस्ताव उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत विहित पध्दतीने सादर करण्यात न आल्यामुळे शासनाकडून निधी मंजुर करण्यात आलेला नाही ही वस्तुस्थिती आहे.

(३), (४) व (५) सन २०१० मध्ये, बी.एस.यु.पी. योजनेसाठी केंद्र शासनाकडून रु. ४.०२ कोटी व राज्य शासनाकडून रु. २.२३ कोटी असा एकूण रु. ६.२५ कोटी इतका निधी प्राप्त झाला होता.

सदर बी.एस.यु.पी. योजना उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत खालील कारणास्तव राबविण्यात आलेली नाही :-

• सदर प्रकल्पासाठी आवश्यक असलेला भूखंड विहित मुदतीत हस्तांतरीत झाला नाही.

• सदर भूखंडावर शाळेचे आरक्षण होते व सदर योजनेस लाभार्थींचा काही प्रमाणात विरोध होता.

• मार्च २०१२ अखेरपर्यंत जी घरकुले प्रत्यक्ष प्रगतीपथावर असतील अशाच घरकुलांकरिता केंद्र शासनाचा निधी उपलब्ध होऊ शकेल अशा सूचना केंद्रीय गृहनिर्माण व शहरी गरीबी निर्मुलन मंत्रालय यांनी दिल्या होत्या.

सदर योजनेची अंमलबजावणी न झाल्यामुळे, केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला रु.४.०२ कोटी व राज्य शासनाकडून प्राप्त झालेला रु.२.२३ कोटी असा एकूण रु.६.२५ कोटी इतका निधी माहे डिसेंबर २०१३ मध्ये रु.३२,३२,६७३/- इतक्या व्याजासह परत करण्यात आला आहे.

तथापि, शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्याने वाल्मिकी वसाहतीचे काम उल्हासनगर महानगरपालिकेच्या निधीतून करण्यात आले आहे.

-----------------

# मंगरुळ चव्हाळा, दत्तापूर, तळेगाव दशासर, मंगरुळ दस्तगीर (जि.अमरावती) येथे नविन प्रशासकीय इमारत व पोलीस वसाहत बांधण्याबाबत

**(५) * ९६८५० प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागातील मंगरुळ चव्हाळा (ता.नांदगाव खंडेश्वर) येथे नविन प्रशासकीय इमारत, पोलीस अधिकारी/ कर्मचारी निवास बांधकामाचा प्रस्ताव अप्पर पोलीस महासंचालक (नि.व.स.) महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मर्यादित, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ग्रामीण भागातील पोलीस स्टेशन दत्तापूर, तळेगाव दशासर, मंगरुळ दस्तगीर येथील पोलीस अधिकारी/कर्मचारी निवास बांधकामाचा प्रस्ताव अप्पर पोलीस महासंचालक (नि.व.स.), महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत अपर मुख्य सचिव, गृह विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील मंगरुळ चव्हाळा (ता.नांदगाव खंडेश्वर) येथे नविन प्रशासकीय इमारत व पोलीस अधिकारी/कर्मचारी निवास बांधकाम तसेच दत्तापूर, तळेगाव दशासर, मंगरुळ दस्तगीर येथील पोलीस अधिकारी/कर्मचारी निवास बांधकामाच्या प्रस्तावास निधीसह मान्यता देणेसंबंधी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री तसेच अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग यांना दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रशासकीय इमारत बांधकाम व निवासस्थान बांधकामाच्या प्रस्तावास निधीसह मान्यता देणेसंबंधी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

(४) पोलीस ठाणे, मंगरुळ चव्हाळा, तालुका-नांदगांव खंडेश्वर, जिल्हा-अमरावती, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारत व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी शासकीय निवासस्थानाचे बांधकाम करणे याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे संदर्भ केला असून उक्त प्रकल्प हा नियोजन स्तरावर आहे.

तसेच, दत्तापूर, तळेगांव दशासर व मंगरुळ दस्तगीर येथे पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्याकरिता शासकीय निवासस्थाने यांचे बांधकाम करण्याबाबतचे प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून मान्यता प्राप्त झाली असून, सदर प्रस्ताव हा रुपये पाच कोटी इतक्या रक्कमेपेक्षा जास्त असल्याने शासनाच्या उच्चस्तरिय सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डीएसके उद्योग समूह, पुणे यांचेकडून ठेवीदारांच्या ठेवींचा झालेला गैरव्यवहार

**(६) * ९५१८० श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डीएसके उद्योग समूह, पुणे यांचेकडून ठेवीदारांच्या ठेवींचा मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठेवीदारांची फसवणूक केल्याच्या आरोपावरून डीएसके उद्योग समूह यांच्या विरोधात आर्थिक गुन्हे शाखेकडे ३५१ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तक्रारदारांमध्ये बहुसंख्य तक्रारदार हे निराधार व ज्येष्ठ नागरिक आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ठेवीदारांची फसवणूक केल्याच्या आरोपावरून डीएसके उद्योग समूह यांचे विरोधात आर्थिक गुन्हे शाखा, पुणे यांचेकडे २८५१ व आर्थिक गुन्हे शाखा मुंबई यांचेकडे ३५३ गुंतवणूकदारांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी शासनाने फिर्यादीचे तक्रारीवरून डीएसके उद्योग समुहाचे संचालक दिपक सखाराम कुलकर्णी (डीएसके) व इतर दोन आरोपीविरोधात शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.नं. ३४७/२०१७ भादंवि कलम ४२०, ४०६, ४०९, ३४, १२०(ब), एमपीआयडी कायदा कलम ३ व ४ तसेच प्राईज चिट अँड मनिसर्क्युलेशन ॲक्ट १९७८ चे कलम ३, ४, ५, ६ भारतीय रिझर्व बँक ॲक्ट कलम ४५ (एस), ४५ (आय), ए/५८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच शिवाजी पार्क पोलीस ठाणे , मुंबई येथे गु.र.नं. ३०९/२०१७ कलम ४०६, ४२०, ३४ भा.दं.वि. सह कलम ३ व ४ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय आस्थापनांमधील) हितसंबंधाचे संरक्षण कायदा १९९९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाची स्वरूप व व्याप्ती मोठी असल्यामुळे सदरचा गुन्हा पुढील तपासकामी आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे.

वरील नमुद दोन्ही गुन्हे तपासावर आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे सिडकोने सुरु केलेले काम प्रकल्पग्रस्तांनी बंद पाडल्याबाबत

**(७) * ९५२७३ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी भरावाचे सिडकोने सुरु केलेले काम, प्रकल्पग्रस्तांनी 'आधी पुनर्वसन आणि मग भुसंपादन' या त्यांच्या मागणीवर निर्णय होईपर्यंत बंद पाडल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधी पुनर्वसन करुन नंतर काम सुरु करण्याबाबतचा निर्णय दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी पर्यंत घेण्यात येईल असे शासनाने मान्य केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी लागणाऱ्या भूसंपादनामुळे बाधित गावातील ग्रामस्थांच्या पुनर्वसनाबाबत तसेच बाधीत प्रकल्पग्रस्तांना २२.५ टक्के विकसीत भूखंड, भरावाची ५० टक्के कामे व संपूर्ण पुनर्वसन आदींबाबत शासन स्तरावरील निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संपादित केलेल्या जमिनींवरील प्रकल्पबाधितांसाठी शासन निर्णय दि.१.३.२०१४, दि.२८.५.२०१४ तसेच दि.२२.९.२०१७ च्या धोरणानुसार पुनर्वसन तसेच २२.५ टक्के नुसार लाभ देण्यात येत आहेत. विमानतळासाठी आवश्यक जमिनीचा भराव करण्याची ५० टक्के कामे स्थानिक प्रकल्पग्रस्त संस्थांना प्रदान करण्याचे धोरण सिडकोने प्रस्तावित केले असून त्यानुसार सिडको स्तरावर याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली शहर पोलीस ठाण्यातील कोठडीत जबर मारहाण केल्याने अनिकेत कोथळे याचा झालेला मृत्यू

**(८) * १०००३३ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), ॲड.वारीस पठाण (भायखळा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कवलापूर (ता.मिरज, जि.सांगली) येथील अभियंता संतोष गायकवाडे यांची फसवणूक केल्या प्रकरणी अनिकेत कोथळे व सुनील भेंडारे रा.भारतनगर (जि.सांगली) या दोघांना सांगली शहर पोलींसानी अटक केली होती व अटकेत असलेला आरोपी अनिकेत कोथळे यास पोलीसांनी पंख्याच्या हुकला उलटे टांगून जबर मारहाण करून त्याचे डोके पाण्यात बुडवून ठेवल्यामुळे त्याचा मुत्यू झाल्याची घटना दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निर्दशनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांच्या अत्याचारामुळे पोलीस कोठडीत मृत्यु पावल्याने हे प्रकरण दडपण्यासाठी पोलीसांनी अनिकेत कोथळे याचा मृत्यदेह आंबोली (जि.सिंधदुर्ग) या घाटात नेऊन जाळून टाकला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणातील दुसरा आरोपी सुनील भेंडारे याच्या समक्ष हा सर्व प्रकार पोलीसांनी केल्यानंतर याची वाच्यता होऊ नये याकरिता त्यालाही या प्रकारे मारण्यात येईल अशी धमकी भेंडारे यास पोलीसांनी दिली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. सदर घटनेचा सखोल तपास सुरु आहे.
(२) पोलीस कोठडीत मरण पावल्याने हे प्रकरण दडपण्यासाठी पोलीसांनी अनिकेत कोथळे याचा मृतदेह आंबोली, जि.सिंधुदूर्ग या घाटात नेऊन जाळून टाकला, हे प्रथम दर्शनी खरे आहे.
(३) आरोपी अमोल भंडारे याच्या समक्ष हा सर्व प्रकार पोलीसांनी केल्यानंतर याची वाच्यता होऊ नये, याकरीता त्यालाही अशा प्रकारे मारण्यात येईल, अशी धमकी भंडारे यास पोलीसांनी दिली होती, असे आरोपी अमोल भंडारे याने त्याच्या जबाबात नमुद केले आहे.
(४) होय. सांगली शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. क्र. २४३/२०१७, भा.दं.वि. कलम ३०२, २०१, ३३०, ३३१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर प्रकरणी राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत सखोल तपास सुरु आहे. आतापर्यत झालेल्या तपासामध्ये सदर गुन्हयात सांगली शहर पोलीस स्टेशन येथील संबंधित १ पोलीस उपनिरिक्षक, २ पोलीस हवालदार, १ पोलीस शिपाई, १ पोलीस वाहन चालक व १ खाजगी इसम यांचा समावेश असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक ०८.११.२०१७ रोजी अटक करण्यात आली असुन सद्यस्थितीत, सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. यातील, पोलीस उपनिरिक्षक व पोलीस हवालदार/शिपाई/चालक अशा एकुण ५ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय सेवेतुन बडतर्फ करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) शहरात उभारलेला बायोगॅस प्रकल्प बंद असल्याबाबत

**(९) * १००४५४ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.रत्नागिरी) शहरात प्रतिदिन निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी सुमारे रुपये २५ लाख खर्च करुन उभारण्यात आलेला

बायोगॅस प्रकल्प मागील सात ते आठ महिने बंद असल्याने सदर योजना प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पातून निर्माण होणारा गॅस शासकीय रुग्णालयासाठी वापरात आणला जात होता तसेच हा प्रकल्प बंद असल्याने शहरातील कचरा पुन्हा डंपिग ग्राउंड मध्ये टाकला जात असल्याने या परिसरातील नागरिकांकडून अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बंद पडलेला बायोगॅस प्रकल्प दुरुस्त करुन पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

• सदर बायोगॅस प्रकल्पाच्या डोमची भिंत कोसळल्यामुळे प्रकल्प माहे सप्टेंबर, २०१६ पासून बंद करण्यात आला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

बायोगॅस प्रकल्प बंद झाल्यामुळे नागरीकांकडून याबाबतीत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

• सद्यस्थितीत नगरपरिषदेच्या विविध खुल्या जागांमध्ये कंपोस्ट पीट तयार करण्यात आले असून त्यामध्ये ओल्या कचऱ्यापासून कंपोस्टखत तयार करण्यात येत आहे.

(३) बंद पडलेला बायोगॅस प्रकल्प दुरुस्त करुन पुन्हा कार्यान्वित करण्याची कार्यवाही नगरपरिषदेमार्फत सुरु आहे.

• शहरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी तयार केलेल्या रु.१.८७ कोटी किंमतीच्या प्रकल्प अहवालास दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या सन २०१५ मध्ये काढण्यात आलेल्या सोडतीतील विजेत्यांना घराचा ताबा मिळाला नसल्याबाबत

**(१०) * ९६०५८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाने सन २०१५ मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी मालाड-मालवणी येथील घरांसाठी काढलेल्या लॉटरीतील १६८ घरांना मुंबई महानगरपालिकेने भोगवटा प्रमाणपत्र देऊनही सदर घरांचा ताबा सोडतीतील विजेत्यांना म्हाडाने अद्याप दिलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सोडतीतील विजेत्यांनी घरांची संपूर्ण रूपये १९ लाख इतकी रक्कम म्हाडाकडे जमा केलेली असतानाही विजेत्यांना अद्याप घरांचा ताबा देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मालाड मालवणी येथील काही घरांना अद्यापपर्यंत भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भोगवटा प्रमाणपत्र व ताबा मिळाला नसतानाही संपूर्ण रक्कम घेतल्यामुळे विजेत्यांकडून व्याजाची रक्कम मिळण्याकरिता मागणी केली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विजेत्यांना लवकरात लवकर घराचा ताबा मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) अंशत: खरे आहे.

उपाध्यक्ष, म्हाडा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाने २०१५ मध्ये मालवणी मालाड येथील (संकेत क्रमांक ३१४) बांधकाम सुरु असलेल्या मालवणी मालाड येथील अत्यल्प उत्पन्न गटाच्या २३२ सदनिकांची सोडतीमार्फत विक्रीची जाहिरात प्रसिध्दीस दिली होती. सदरहू सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या २३२ लाभार्थ्यांपैकी २०४ अर्जदार सदनिका वितरणास पात्र ठरले होते. सदरहू इमारतींना दि. १.९.२०१७ व

दि.१२.१०.२०१७ रोजी महानगरपालिकेने भोगवटा प्रमाणपत्र दिले असल्याने २०४ पात्र लाभार्थ्यांपैकी ११२ लाभार्थ्यांना सदनिकांचे ताबा वितरणपत्र देण्यात आले आहे. व त्यापैकी १०५ लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष सदनिकांचा ताबा घेतला आहे.

(२) सदरहू इमारतीस महानगरपालिकेकडून तांत्रिक बाबींमुळे भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यास विलंब झाल्यामुळे सोडतीतील लाभार्थ्यांना सदनिकांचा ताबा देण्यास उशिर झाला आहे, असे म्हाडाने कळविले आहे. तसेच सोडतीतील लाभार्थ्यांनी मुंबई मंडळाकडून वितरीत करण्यात आलेल्या देकारपत्राच्या अनुषंगाने सदनिकेच्या विक्री किंमतीपोटी पूर्ण रक्कम जमा केली आहे, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) हे खरे आहे.

म्हाडाच्या अहवालानुसार यशस्वी लाभार्थ्यांनी भोगवटा प्रमाणपत्राअभावी ताबा मिळाला नसताना विलंबाने भरलेल्या सदनिकेच्या विक्री रकमेवर वसुल करण्यात आलेले व्याज परतावा करणेबाबत मागणी केली असता सदर विषयी दोन्ही इमारती क्र. १ व २ यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळेपर्यंत अर्जदारांनी भरलेल्या रकमेवर विलंब व्याज माफ करावे व ज्या अर्जदारांकडून भोगवटा प्रमाणपत्र मिळणेपूर्वी विलंब रकमेवर व्याज आकारण्यात आले आहे, त्यांना व्याजाची रक्कम परत करावी, अशा प्रस्तावास म्हाडा प्राधिकरणाने दि. ०२.११.२०१७ रोजी मान्यता दिली असून संबंधित लाभार्थ्यांचे व्याज परतावा करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

(५) सद्य:स्थितीत ११२ लोकांना सदनिकांच्या ताबापत्राचे वितरण करण्यात आले असून त्यापैकी १०५ लाभार्थ्यांनी सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. सदनिकेचा ताबा वितरण प्रक्रिया प्रगती पथावर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नरिमनपॉईंट ते कांदिवली सागरी किनारा मार्ग ठाण्यापर्यंत विस्तारीत करण्याबाबत

**(११) * ९५४०७ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने प्रस्तावित केलेला नरिमनपॉईंट ते कांदिवली हा ३५ कि.मी. सागरी किनारा मार्ग ठाण्यापर्यंत करण्यात येणार असून सदर विस्तारीत मार्ग मार्वे, भाईंदर, घोडबंदरपर्यंत करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सागरी किनारा मार्गासाठी किती खर्च येणार आहे,

(३) असल्यास, सदर मार्गाच्या प्रकल्प अहवालासाठी सल्लागारांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचा तपशील काय आहे,

(४) असल्यास, सदरहू रस्त्याचे काम केव्हा सुरु करण्यात येणार आहे व ते कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रस्तावित नरिमन पॉईंट ते कांदिवली या सागरी मार्गाची प्रिन्सेंस स्ट्रीट फ्लायओव्हर ते वरळी (end of Sea Link) भाग-अे व बांद्रा (end of Sea Link) ते कांदीवली जंक्शन लिंक रोड भाग-बी या दोन भागामध्ये विभागणी करण्यात आलेली असून भाग-अे संदर्भात पर्यावरण विभागाची मान्यता प्राप्त झालेली असून महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यामध्ये आहे. भाग-बी बाबतही या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे. तथापि सागरी महामार्गाचे विस्ताराचे अनुषंगाने सद्यस्थितीमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडून कार्यवाही सुरु नाही.

(२) ते (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील रुक्मिणीबाई रुग्णालयाच्या बेजबाबदारपणाबाबत

**(१२) * ९५२०१ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील रुक्मिणीबाई रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल झालेल्या गरोदर महिलेचे बाळ डॉक्टर उपलब्ध नसल्याने दगावल्याच्या घटनेमुळे रुग्णालयाचा बेजबाबदारपणा माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, रुग्णालयात उपचार घेत असलेल्या गरोदर महिलेला देण्यात आलेल्या गोळ्यांमध्ये तारा असल्याचेही दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उपरोक्त दोन्ही प्रकरणी दोषी असलेल्यांवर व ज्या कंपनीने औषधे व गोळ्या पुरविल्या आहेत त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दि.१३/१०/२०१७ रोजी कल्याण येथील रुक्मिणीबाई रुग्णालयात प्रसुतीसाठी दाखल झालेल्या महिलेस मृत बाळ जन्माला आले, हे खरे आहे. तथापि, सदर घटना रुग्णालयाच्या बेजबाबदारपणामुळे घडली, हे खरे नाही.

(२) सदर विषयाबाबत गटनेता, श्री.प्रकाश भोईर यांनी दि.०४/१०/२०१७ रोजी महानगरपालिकेत लक्षवेधी उपस्थित केली होती, तसेच याबाबत दि.०४/१०/२०१७ च्या “महाराष्ट्र टाईम्स” या वृत्तपत्रात बातमीही प्रसिद्ध झाली होती.

(३) कल्याण (जि.ठाणे) येथील रुक्मिणीबाई रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल झालेल्या गरोदर महिलेचे बाळ मृत जन्मास आल्याने या प्रकरणी महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाच सदस्यीय चौकशी समितीने केलेल्या प्राथमिक चौकशीत त्यावेळी कार्यरत ऑन ड्युटी “स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ” व “स्टाफ नर्स” यांचा काहीही दोष नसल्याचे निष्पन्न झाले आहे.

तसेच रुग्णालयात उपचार घेत असलेल्या गरोदर महिलेला देण्यात आलेल्या गोळयांमध्ये तारा असल्याबाबत संबंधित महिलेने महानगरपालिकेकडे कोणतीही लेखी तक्रार केलेली नाही. तथापि, याबाबत वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत सदर औषध समुहाचे नमुने पुढील योग्य त्या तपासणीकरिता अन्न व औषध प्रशासन, ठाणे यांच्याकडे दि.०४/१०/२०१७ रोजी पाठविण्यात आलेले आहेत. याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. सदर औषधाच्या समूह क्रमांकाच्या सर्व औषध साठ्याचा वापर तात्काळ थांबविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आंबेठाण (ता.खेड, जि.पुणे) येथील सोळबन परिसरात स्वस्तात घरे देण्याचे आमिष दाखवून नागरिकांची केलेली फसवणूक

**(१३) * ९९०८७ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेठाण (ता.खेड, जि.पुणे) मधील सोळबन परिसरात गायरान जमीनीवर मोठा गृह प्रकल्प बांधून स्वस्तात घरे देण्याचे आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक करण्यात आल्याचे दिनांक २ फेब्रूवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हक्काचे घर देण्याचे खोटे आमिष दाखवून अनेकांकडून प्रत्येकी २० हजारांपासून ५० हजार रूपयांपर्यंतची रक्कम घेऊन त्यांची फसवणूक करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर दहा महिलांनी दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास चाकण पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तसेच सदर प्रकरणी दहा महिलांनी दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास चाकण पोलीस ठाणे येथे तक्रार /गुन्हा दाखल केल्याची नोंद नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांद्रे पूर्व (मुंबई) येथील म्हाडा मुख्यालयाच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(१४) * ९७१७० श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे पूर्व (मुंबई) येथील ४० वर्षापूर्वी बांधलेल्या म्हाडा मुख्यालयाच्या इमारतीची दुरवस्था झाली असून उक्त इमारतीचे संरचनात्मक परिक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचा निर्णय म्हाडाने घेतला असल्याचे दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार उक्त इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) म्हाडाकडून प्राप्त अहवालानुसार म्हाडा मुख्यालयाच्या तळ मजल्यावरील कक्ष क्र. ३२ येथील स्वच्छतागृहात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून काही लाकडी टेकू लावण्यात आले असून इमारतीत अन्य कोठेही टेकू लावण्यात आलेले नाहीत. भिंतींना व खांबांना काही ठिकाणी तडे गेले असल्याने संरचनात्मक दुरुस्तीची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मुख्यालयाच्या काही भागाची मे,२०१७ मध्ये संरचनात्मक दुरुस्ती पूर्ण करण्यात आली. सदरहू काम प्रगतीपथावर असताना दुरुस्तीच्या कामात वाढ झाल्याचे निदर्शनास आल्याने सप्टेंबर २०१७ मध्ये इमारतीचे पुन्हा संरचनात्मक परिक्षण (Structural Audit) मे. एस. पी. बागवे यांचे मार्फत करुन घेण्यात आले व त्यांनी दिलेल्या अहवालावर आधारित संरचनात्मक दुरुस्तीच्या सुधारित अंदाजपत्रकास
दि. १६.११.२०१७ रोजी सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

संरचनात्मक दुरुस्तीच्या उर्वरित कामाबाबत फेर निविदा मागवून कंत्राटदाराची नियुक्ती केली जाईल व गृहनिर्माण भवनाच्या उर्वरित भागाचे काम हाती घेण्यात येईल असे देखील मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## अकोला जिल्हयातील बियाणे महामंडळ (महाबीज) कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे तत्कालीन सचिव यांनी शेतकऱ्यांची केलेली फसवणूक

**(१५) * ९८१७९ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील बियाणे महामंडळ (महाबीज) कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे तत्कालीन सचिव डी.एन.देशमुख यांनी शेतकऱ्यांचे धनादेश, धान्य विक्री, बियाणे वितरण, रोख रक्कम यामध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे लेखापरिक्षण अहवालातून माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पोलिसात तक्रार दाखल होऊनही अद्याप कोणतीच कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी फिर्यादी जिल्हा व्यवस्थापक, महाबीज शिवणी, अकोला यांचे तक्रारीवरून १७ आरोपींविरूद्ध पोलीस स्टेशन सिव्हील लाईन, अकोला येथे अप. क्र. ३०३/१५ कलम ४२०, ४०८, ४०९, ४६७, ४६८, ४७१, १०९, १२०(ब), ३४ भांदवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील १७ आरोपींपैकी ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे, १ आरोपी मृत पावला आहे तर उर्वरीत ९ आरोपी हे विशेष न्यायालयाने मंजुर केलेल्या अंतरीम जामीनावर आहेत. गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगर परिसरामधील संक्रमण शिबिरातील रहिवाश्यांच्या मास्टर लिस्टमधील मूळ कागदपत्रांच्या नस्त्या गहाळ केल्याबाबत

**(१६) * ९७३७७ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर परीसरामधील संक्रमण शिबीरातील वर्षानुवर्षे हक्काच्या घरासाठी प्रतिक्षेत असलेल्या ४० ते ४५ रहिवासी यांच्या मास्टर लिस्टमधील मूळ कागदपत्रांच्या नस्त्या म्हाडाचे अधिकारी व दलालांनी संगनमत करुन गहाळ केल्याप्रकरणी सदर रहिवाश्यांनी संबंधितांविरुध्द वांद्रे खेरवाडी पोलीस ठाण्यात लेखी तक्रारी दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पोलिसांनी अद्यापीही कोणतीच कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चैकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच संक्रमण शिबीरातील रहिवाशांना घरे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय. सदर आशयाचा तक्रार अर्ज खेरवाडी पोलीस ठाण्यात प्राप्त झालेला आहे.

(२) अंशत: खरे आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने या प्रकरणी प्रथम खबरी अहवाल (FIR) दाखल केलेला नसला तरी तक्रारीसंदर्भात सविस्तर चौकशी करुन त्या बाबतचा चौकशी अहवाल सादर करण्याबाबत खेरवाडी पोलिस ठाणे यांनी मुख्याधिकारी, म्हाडा, मुंबई तसेच मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, म्हाडा, मुंबई यांना दिनांक २४.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) व (४) म्हाडाच्या अहवालानुसार विचाराधीन तक्रार अर्जाची चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यासंदर्भात दि.२९.०९.२०१७ च्या कार्यालयीन आदेशान्वये व्दिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीच्या चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार पुढील यथोचित कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

त्याचप्रमाणे म्हाडा प्राधिकरणाच्या ठराव क्र. ६५२०, दि. ०३.०३.२०११ अन्वये "बृहतसूचीवरुन गाळे वितरण करणे" याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले असून या प्रयोजनासाठी दि. २७.०२.२०१३ तसेच २२.१०.२०१३ रोजी जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या असून, जाहिरातीला प्रतिसाद दिलेल्या एकूण १४९७ अर्जदारांची सुनावणी घेण्यात आली असून प्राप्त अर्जांपैकी पात्र ठरलेल्या अशा एकूण ३४६ अर्जदारांना गाळ्यांचे वितरण करण्यात आले आहे.

-----------------

## मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकरणांमध्ये केलेले गैरव्यवहार

**(१७) * ९५०११ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास पाटील यांनी सेवानिवृत्तीपूर्वी मान्यता दिलेल्या १३७ झोपडपट्टी पुनर्वसनाच्या प्रकरणांपैकी ३३ प्रकरणात अनियमितता आढळून आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टी पुर्नवसनाच्या सुमारे दोनशे प्रकरणांना जलदगतीने मान्यता दिल्यामुळे श्री.पाटील यांनी मंजूर केलेल्या झोपडपट्टी पुर्नवसनाच्या प्रकरणांना मा.मुख्यमंत्री यांनी स्थगिती दिली असून राज्याचे नगरविकास संचालक व गृहनिर्माण खात्याचे अधिकारी यांचा समावेश असलेल्या समितीने उक्त प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले असून पाटील यांनी ताडदेव येथील एमपी मिल कंपाऊड एसआरए प्रकरणातही वाढीव एफएसआय अनधिकृत मंजूर केल्याचे उक्त समितीच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.विश्वास पाटील यांनी जुहूतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पत्नीला विकासकाबरोबर भागीदार बनवून गैरव्यवहार केल्याचेही निदर्शनास आल्यानंतर सदर फाईल झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातून गहाळ झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अतिरीक्त कोकण विभागीय आयुक्त शिवाजी दौंड यांनी विश्वास पाटील यांची चौकशी पूर्ण करुन पाच वर्षांचा कालावधी उलटूनही त्यांच्यावर कोणतीही कारवाई न झाल्याने सेवानिवृत्त होईपर्यंत ते शासनातील वेगवेगळया लाभाच्या पदांवर कार्यरत होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर शासकीय भूखंड जुहू समुद्रकिनारी असून सदर प्रकल्पांसाठी सीआरझेडची परवानगी तसेच इतर चटई क्षेत्रफळ विषयक परवानगीबाबत स्वतंत्र समिती मार्फत चौकशी होणे आवश्यक असल्याचे श्री.दौंड यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विश्वास पाटील यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) ३३ प्रकरणात अधिक तपासणीची आवश्यकता असल्याचे आढळून आले असून प्राधिकरण स्तरावर अशी तपासणी करण्यात येत असल्याचा प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(२) हे खरे नाही.

तसेच ताडदेव एम.पी.मिल येथील झोपडपट्टी योजनेचे प्रकरण देखिल वर नमूद अधिक तपासणीमध्ये अंत:र्भूत आहे असा प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(३) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतची प्राधिकरणाची नस्ती प्राधिकरणाचे अभिलेख कक्षात उपलब्ध नसल्याने निर्मल नगर पोलीस ठाण्यामध्ये दैनंदिनी क्र.२५९९/१७ दि. ३०.११.२०१७ अन्वये नस्ती गहाळ झाल्याची तक्रार करण्यात आली आहे.

(४) व (५) अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे प्राथमिक चौकशी करण्याचे काम सोपविण्यात आले होते. प्राथमिक चौकशी अहवाल उपलब्ध करुन देणेबाबत विभागीय आयुक्त कार्यालयास विनंती करण्यात आलेली आहे.

(६) उत्तर क्र.१ च्या अनुषंगाने व क्र.४ व ५ च्या अनुषंगाने विभागीय आयुक्तांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## अंधेरी (पूर्व) रेल्वे स्थानकाबाहेर ५० मीटरच्या आत व मेट्रो स्टेशनखालील रस्त्यावरील अनधिकृत स्टॉल्सबाबत

**(१८) * ९८६४७ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्व रेल्वे स्थानकाबाहेर १५० मीटरच्या अंतरापर्यंत पदपथ व रस्ते मोकळे ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी न्यायालयीन आदेशानुसार रेल्वे स्थानकापासून १५० मीटर अंतरापर्यंत व नगरविकास विभागाने तयार केलेल्या फेरीवाला उपविधी सन २००९ नुसार १०० मीटर अंतरापर्यंत पदपथ व रस्त्यावर कोणत्याही फेरीवाल्यास अथवा स्टॉल उभारण्यास बंदी घालण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंधेरी (पूर्व) रेल्वे स्थानकाबाहेर ५० मीटर अंतराच्या आत वर्टेक्स शॉपिंग सेन्टर येथे रस्त्यावर ९ स्टॉल्सना तसेच अंधेरी मेट्रो स्टेशनखालील रस्त्यावर वडापाव सेंटर व पानाची गादी यांना महानगरपालिकेच्या धोरणाविरुद्ध व याबाबतचे अधिकार नसताना सहाय्यक आयुक्त, के/पूर्व यांनी सन २०१६ मध्ये परवानगी दिली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी महानगरपालिका आयुक्त व सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग यांच्याकडे नियमबाह्य पद्धतीने उभारण्यात आलेले उपरोक्त स्टॉल्स त्वरित काढण्याकरिता वारंवार लेखी तक्रारी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महानगरपालिका आयुक्त व सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग यांनी न्यायालयाचे आदेश व महानगरपालिकेचे धोरणाविरुध्द सदर स्टॉल्स उभारण्यास परवानगी दिल्याबाबत तसेच तक्रारी प्राप्त झाल्यानंतरही ते तेथून स्थलांतरीत न केल्याबद्दल त्यांच्यावर व अन्य संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ६५२/२०१७ मध्ये दिनांक ०१.११.२०१७ रोजी, सर्व रेल्वे स्थानकाबाहेर १५० मीटरच्या अंतरापर्यंत पदपथ व रस्ते मोकळे ठेवण्याबाबत आदेश दिले आहेत.

(२) महानगरपालिका/नगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) आदर्श उपविधी २००९ मधील तरतुदीनुसार, रेल्वे स्थानकापासून १०० मीटर अंतरापर्यंत ना-फेरीवाला क्षेत्र जाहीर करण्यात आले होते.

(३) पश्चिम रेल्वेच्या दिनांक २१.१२.२०१२ व २१.०८.२०१३ रोजीच्या विनंती पत्रास अनुसरुन, अंधेरी (पूर्व) रेल्वे स्थानकाजवळील रस्त्यावर रहदारीसाठी अडथळा होत असलेले २९ स्टॉल्स, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०८.०२.२०१६ व दिनांक ०९.०२.२०१६ रोजी निष्कासित करण्यात आले होते.

सदर २९ स्टॉल्सपैकी ९ स्टॉल्सधारकांना दिंडोशी येथील मा.सत्र न्यायालयाच्या दिनांक ०२.१२.२०१६ रोजीच्या आदेशानुसार, वर्टेक्स शॉपिंग सेंटर येथील रस्त्याच्या शेजारी, वाहतुकीसाठी अडथळा होणार नाही अशा पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरीत करण्यात आले आहे.

अंधेरी मेट्रो स्टेशनखालील रस्त्यावरील संगम वडापाव सेंटर व पानाची गादी हे स्टॉल्स मेट्रो रेल्वेच्या कामासाठी अडथळा होत असल्याने, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या दिनांक १६.०४.२०१३ रोजीच्या पत्रानुसार, २ महिन्यांच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात हटविण्यात आले होते. मेट्रो रेल्वेचे काम पूर्ण झाल्यानंतर, सदर दोन स्टॉल्सधारक त्यांच्या मूळ जागी स्थलांतरीत झाले होते.

सदर स्टॉल्सधारकांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासनाची नियमित कारवाई करण्यात येत असतांना, त्यांनी दाखल केलेल्या याचिकांच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०२.०३.२०१५ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन, वाहतुकीस व पादचाऱ्यांना अडथळा होणार नाही अशा ठिकाणी त्यांना दिनांक २३.१२.२०१६ रोजी तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरीत करण्यात आले आहे.

(४) व (५) सदर स्टॉल्स त्वरीत काढण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेस लेखी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, नियमानुसार तसेच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वेळोवेळी कार्यवाही केली असल्याने कारवाई करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत सुरु असलेल्या जिगांव सिंचन प्रकल्पात झालेला गैरव्यवहार

**(१९) * ९९५१६ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत सुरु असलेल्या जिगांव सिंचन प्रकल्पाच्या कामाकरिता बाजोरीया कंन्स्ट्रक्शन कंपनी, यवतमाळ यांना पात्र ठरविण्याकरीता बनावट प्रमाणपत्र तयार करुन करोडो रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी दिनांक ४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने ७ अभियंत्यांवर गुन्हे दाखल केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर तसेच उपरोक्त दोषी कंपनीवर  कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.

जिगांव प्रकल्प उपसा सिंचन योजना क्र.२ मध्ये मे.बाजोरिया कंस्ट्रक्शन कंपनी, यवतमाळ निविदेसाठी पात्र नसताना, पात्र ठरावे व त्याचा आर्थिक फायदा व्हावा या गैरउद्देशाने गुन्हेगारी स्वरूपाचा कट व अन्यायाने संगनमत करून कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, चंद्रपूर यांनी कंपनीने निकषाप्रमाणे न केलेल्या कामाचे बनावट प्रमाणपत्र तयार केले. कंपनीने सदर बनावट प्रमाणपत्राचा खरे म्हणून वापर करून व पात्रता अटी तपासणी कार्यवाहीमध्ये बनावट प्रमाणपत्र सादर करून खोटा पुरावा सादर केला व शासनाची फसवणूक केली. असे ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा कडुन करण्यात आलेल्या उघड चौकशी दरम्यान निष्पन्न झाल्याने कंपनीचे संचालक व ७ अभियंता यांचे विरूध्द पो. स्टे. खामगांव शहर अप.क्र ४५२/२०१७ कलम ११९, ४२०, ४६६, ४६८, ४७१, ४७४, १९२, १९३, १९७, १९८, १२०(ब), १०९ भादवि सह (१३) (१) (क) (ड)  सह (२) ला.प्र.वि. १९८८ अन्वये दिनांक ०३.११.२००७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्हयाचा तपास प्रगतीपथावर सुरू आहे.

-----------------

## बुलढाणा (जि.बुलढाणा) शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मुख्य पाईपलाईनची दुरुस्ती करण्याबाबत

**(२०) * ९५९३७ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा (जि.बुलढाणा) शहराला पाणी पुरवठा करणारी मुख्य पाईपलाईन चिखली रस्त्यावर फुटल्यामुळे लाखो लिटर पाणी वाया गेले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या फुटलेल्या पाईपलाईनचे पाणी चिखली रस्त्यावरील घरांमध्ये शिरल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने पाण्याचा अपव्यय थांबविण्यासाठी या फुटलेल्या पाईपलाईनची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर मुख्यवाहिनी मध्ये दि. ४.९.२०१७ रोजी अचानक गळती सुरू झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) व (३) गळतीमुळे रहदारीस होणारा त्रास व परिसरातील मालमत्ताधारकांना होणारा त्रास लक्षात घेऊन त्याच दिवशी शहरातील पाणीपुरवठा खंडीत करून तात्काळ युद्धपातळीवर पाईपलाईनवरील गळती दुरूस्त व सुस्थितीत करण्यात आली व दि. ५ सप्टेंबर, २०१७ रोजी शहरातील पाणीपुरवठा पुर्ववत सुरू करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील चंदनसार, फुलपाडा येथील आदिवासी मिळकतींवर केलेले अनधिकृत बांधकाम

**(२१) * ९९८४२ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील चंदनसार, फुलपाडा येथील सर्व्हे क्र.८६ हिस्सा क्र. १/२, १/४,१/५ व १/१२ ह्या आदिवासी मिळकतींवर महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने रघुवीर अपार्टमेंट, साईज्योती, माऊंट मेरी स्कूल, बालाजी, बद्री विशाल भवन, महालक्ष्मी इत्यादी २५ अनधिकृत इमारतींचे व शाळेचे बांधकाम केल्याप्रकरणी महानगरपालिकेकडून एम.आर.टी.पी कायद्याअंतर्गत दिनांक ५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास संबंधितांवर नोटीसा बजावण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी व्यक्तींच्या जमिनी गैर आदिवासी व्यक्तींच्या नावे होत नसतांनाही श्रीमती सोनाली गोवारी, श्री.धोडगे,श्रीमती जया पाणथळे या आदिवासींच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन संबंधित भूमाफियांनी अधिकारी व कर्मचारी यांच्याशी आर्थिक संगनमत करुन इमारती व शाळेचे अनधिकृत बांधकाम केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी मिळकतींवर बांधण्यात आलेल्या या अनधिकृत इमारतींबाबत विकासकांवर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना प्रभाग अधिकारी यांना देऊनही त्यांच्याकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आदिवासींच्या जमिनींवर अनधिकृत बांधकाम करणाऱ्या विकासकांवर व त्यास प्रोत्साहन देणाऱ्या महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील चंदनसार, फुलपाडा येथील सर्व्हे क्र. ८६ हिस्सा क्र. १/२, १/४, १/५ व १/१२ या आदिवासी मिळकतीवर महानगरपालिकेमार्फत रघुवीर अपार्टमेंट, साई ज्योती, माउंट मेरी स्कुल, बालाजी, बद्री विशाल भवन, महालक्ष्मी इ. २५ अनधिकृत इमारतीचे व शाळेचे बांधकाम केल्याप्रकरणी महानगरपालिकेकडून एम.आर.टी.पी कायद्याअंतर्गत दिनांक ५ जून, २०१७ रोजी २० नोटीसा, दिनांक ०६.०६.२०१७ रोजी १ नोटीस व दिनांक ०३.१०.२०१७ रोजी ८ नोटीसा अशा एकूण आजतागायत वसई विरार शहर महानगरपालिकेने २९ मालमत्तांवर नोटीसा बजावण्यात आल्या आहेत, हे खरे आहे.

(२) या जागेवर २८ बांधकामे तसेच शाळेचे अनधिकृत बांधकाम झाले आहे हे खरे आहे. तसेच सर्वे क्र. ८६ हिस्सा क्र. १/२, १/४, १/५ व १/१२ या जागांवर विकासक व जागामालक यांच्याबरोबर भुईभाडे करार झाला असून उक्त कराराच्या आधारे इमारती व शाळा यांचे बांधकाम झाल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) अनधिकृत इमारतींना महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमा अंतर्गत नोटीस बजाविण्यात आल्या आहेत.

तसेच सदर प्रकरणी आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना १५ दिवसात गुन्हे दाखल करण्याची सुचना देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दापचारी (ता.तलासरी, जि.पालघर) येथील दूध प्रकल्पाच्या परिसरात अंमली पदार्थ जप्त करण्यात आल्याबाबत

**(२२) * ९८४७७ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापचारी (ता.तलासरी, जि.पालघर) येथील दूध प्रकल्पाच्या परिसरातील एका घरावर दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने (एलबीसी) छापा टाकून २६ कोटी रूपयांचे ५.२ किलो हेरॉईन, १० कोटी रूपयांचे २४.६९ किलो एमडीएम आणि ४ कोटी रूपयांचे अन्य अंमली पदार्थ जप्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील तीन आरोपी पळून गेले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

माणिकपूर पोलीस ठाणे गु.रजि. नं.II १६/२०१७ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८(क), २२, २५, २५(अ), २९ या गुन्हयात दि.२४.९.२०१७ रोजी साईबाबा मंदिराजवळ रोडवर स्टेला वसई पश्चिम येथे आरोपीत १) सर्फराज

युसूफ मेमन, रा.वसई, २) सोहेल युसूफ मेमन, रा. वसई हे त्यांचे कब्जातील ऑडी कार क्रमांक एम एच ४६ -डब्लु-७५२७ मध्ये ठेवलेले २१,७०,०००/- रु. किं.चे २१ किलो ७०० ग्रॅम वजनाचे ईपीड्रीन (Ephedrine) नावांचे अंमली पदार्थ आरोपी उछेन्ना स्टिफन ऊकपाबी उर्फ नवान्क्वो स्टीव्ह उछेन्ना यांस विक्री करीत असताना मिळून आल्याने त्यांचे विरुध्द माणिकपूर पो.ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचे तपासात अटक आरोपीत सोहेल युसुफ मेमन याचे दि. ०३.१०.२०१७ रोजी दिलेल्या कबुलीमध्ये त्याने यापूर्वी दुग्ध प्रकल्प, दापचारी, ता. डहाणु, जि. पालघर येथून अंमली पदार्थ आणल्याची कबुली दिल्याने दोन पंचासह दुग्ध प्रकल्प, दापचारी, क्षेत्र क्रं. १२४ या ठिकाणची झडती घेतली असता, सदर क्षेत्रात एक फोरच्युनर गाडी नं.ए.०१/एम एल १९७७ कारमध्ये १) १,६०,०००००/- रु. (आंतराष्ट्रीय किंमत २६ कोटी रुपये) चे ५.२५० कि.ग्रॅम वजनाचा हेरॉईन नावाचा अंमली पदार्थ २) ३७,०३५००/- रु. (आंतराष्ट्रीय किंमत १० कोटी रुपये) चे २४.६९० किलो ग्रॅम वजनाचा आयसोसॅफरॉल नावाचा अंमली पदार्थ मिळून आले. तसेच या क्षेत्रातील एका टेम्परर शेडखाली ४५,५०,०००/- रु. (आंतराष्ट्रीय किंमत ३.५ ते ४ कोटी रुपये) चे ९.१२५ किलो ग्रॅम वजनाचे अनोन अंमली पदार्थ तसेच इतर साधन सामुग्री मिळून आली आहे. तसा भा.पु.का. कलम २७ प्रमाणे सविस्तर मेमोरंडम पंचनामा करण्यात आला आहे. सदर मिळून आलेल्या पदार्थाचे नमूने तपासणीकरीता प्रयोगशाळा कलीना, मुंबई येथे पाठविण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही सदर ठिकाणावरुन कोणीही पळून गेलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विविध उद्योजक व कंपन्यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला देय असलेली कोट्यवधीची रक्कम थकविल्याबाबत

**(२३) * ९५०७१ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.चंद्रकांत सोनवणे**

**(चोपडा), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध उद्योगपती, आयकर खाते, जमुनाबेन फाऊंडेशन, इंडियन न्यूजपेपर सोसायटी, ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्स, नमन हॉटेल, तालीम रिसर्च फाऊंडेशन, रिलायन्स इंडस्ट्रीज लि.कं., जमुनालाल हिराचंद अंबानी फाऊंडेशन इत्यादी कडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) हजारो कोटी रुपये येणे असून सदर व्यक्ती/संस्थांनी उक्त थकबाकी मागील अनेक वर्षांपासून एमएमआरडीएकडे जमा केली नसल्याचे माहिती अधिकारातंर्गत दिनांक ६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिलायन्स इंडस्ट्रीज लि.यांचेकडून रुपये १२०० कोटी, अतिरिक्त अधिमूल्य रुपये १६०० कोटी, इंडियन न्यूज पेपर रुपये ५४ कोटी, अतिरिक्त एफएसआय रुपये ५० कोटी, नमन हॉटेल रुपये ३२ कोटी, ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्स रुपये २५ कोटी इत्यादी येणे असलेली रक्कम एमएमआरडीएने अद्यापही वसूल केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित सर्व कंपन्या व उद्योजक यांनी शासनाचे हजारो कोटी रुपये मागील अनेक वर्षांपासून थकविले असताना शासनाने त्यांच्याविरोधात कोणतीच कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर रक्कम वसूल करण्याकरीता एमएमआरडीएतर्फे अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२), (३), (४) व (५) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मालकीच्या वांद्रे-कुर्ला संकुलाच्या “जी”-ब्लॉकमधील वाटप केलेल्या भूखंडावरील इमारतीचे बांधकाम पूर्णत्वाच्या ४ वर्षांच्या निर्धारित कालावधीत बांधकाम पूर्ण न केल्यामूळे माहे नोव्हेंबर, २०१७ अखेर इंडियन न्यूजपेपर सोसायटी (भूखंड क्र.सी-६३) रु. ५६.०२ कोटी, मे. रिलायन्स इंडस्ट्रिज (इंडिया) लि. (भूखंड क्र.सी-६६) रु.४४१.०८ कोटी, मे. रिलायन्स इंडस्ट्रिज (इंडिया) लि. (भूखंड क्र.सी-६४) रु.१५३८.७३ कोटी, जमुनाबेन फाऊंडेशन (भूखंड क्र. एस्.एफ.७ आणि ९बी) रु.२४.०९ कोटी, तालीम रिसर्च फाऊडेंशन (भूखंड क्र. एस्.एफ ६) रु.३३.३९ कोटी आणि नमन हॉटेल (भूखंड क्र. सी-५७ आणि ५८) रु.३१.६८ कोटी अशी भूखंडाच्या वाटपधारकांकडून अतिरिक्त अधिमूल्याची भरणा रक्कमेची थकबाकी आहे.

परंतु, ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्स (भूखंड क्र.सी-२९) व आयकर खाते (भूखंड क्र.सी-४१ ते सी-४३) यांनी विशिष्ट कालावधीकरीता अधिमूल्याचा भरणा केला आहे व त्यांच्या भूखंडावरील इमारतीचे बांधकाम चालू आहे.

उक्त अधिमूल्याचा भरणा करणेसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दि. १२/०९/२०१७ रोजी भूखंड परत घेण्याची नोटीस या वाटपधारकास दिली आहे.

-----------------

## खडकपाडा (गोरेगांव (पूर्व), मुंबई) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत

**(२४) * ९५८८३ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेसर्स अमी कार्पोरेशनचे निपून ठक्कर या विकासकाने खडकपाडा (गोरेगांव (पूर्व), मुंबई) येथील झोपडपट्टी पुनर्वसनाच्या सर्व्हेक्षणाचे काम झोपडीधारकांची, म्हाडाची व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची परवानगी न घेता सुरु केले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे काम तातडीने बंद करण्याच्या मागणीसाठी स्थानिक नागरीकांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास रस्त्यावर उतरुन तीव्र आंदोलन केले होते तसेच याबाबत दिंडोशी, पोलीस ठाणे येथे तक्रारी करुनही अद्याप सर्व्हेक्षणाचे काम बंद करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन विकासकावर फौजदारी गुन्हा दाखल करुन कामास स्थगिती देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र क्षेत्र विकास गृहनिर्माण मंडळ व पोलीस आयुक्त, मुंबई यांच्याकडे दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) मे.अमी कॉर्पोरेशन यांनी सदर योजनेच्या प्रस्तावाकरिता दि.२०.०४.२००९ रोजी LOI Scrutiny Fee म्हणून रु.११३५०/- चा भरणा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचेकडे केला आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.२७.०८.२००९ च्या पत्रान्वये परिशिष्ट-२ तयार करण्याकरिता म्हाडाकडे प्रस्ताव सादर केला. सदर एसआरए योजनेसाठी संबंधित संस्था साई विसावा गृहनिर्माण संस्था यांनी दि.१४.०९.२००९ रोजी म्हाडा प्राधिकरणाकडे रु.५०००/- छाननी शुल्क म्हणून भरणा केले आहे. तद्नंतर झोपडयांचे सर्व्हेक्षण (१९९५ च्या अनुषंगाने) करण्यात आले व विकासक मे.अमी कॉर्पोरेशन यांना म्हाडाच्या मुंबई मंडळामार्फत दि. ११ जुलै, २०१४ रोजी कळविण्यात आले.
(२) संस्थेच्या काही झोपडीधारकांनी दि.१२.०९.२०१७ रोजी केलेल्या विनंतीनुसार सर्वेक्षणाचे काम दि. २१.०९.२०१७ रोजी सुरु केले होते, परंतू काही झोपडीधारकांनी सर्वेक्षणास विरोध केल्याने सर्वेक्षणाचे काम सुरु होऊ शकले नाही.

(३) व (४) विकासक मे.अमी कॉर्पोरेशन यांचेविरुध्द दिंडोशी पोलीस ठाण्यास साई विसावा सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) यांचेकडून तक्रार अर्ज प्राप्त झालेले असून, सदर अर्जाची चौकशी चालू असल्याचा दिंडोशी पोलीस ठाण्याचा अहवाल आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूरमध्ये वधुवर सूचक मंडळाच्या नावाखाली अल्पवयीन मुलींची तस्करी होत असल्याबाबत

**(२५) * १००३२२ श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूरमध्ये वधुवर सूचक मंडळाच्या नावाखाली अल्पवयीन मुलींची तस्करी होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर मधील सन २०१६ मध्ये ९ तर सन २०१७ मध्ये १४ अल्पवयीन मुली बेपत्ता असल्याच्या तक्रारी दाखल झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वधुवर सूचक मंडळाच्या माध्यमातून अल्पवयीन मुलींचे अपहरण करुन त्यांना अन्य जिल्ह्यात नेऊन त्यांचे लग्न लावून देण्यात येत असल्याने महिला तस्करीशी संबंधित किती वधुवर सूचक मंडळांची चौकशी करण्यात आली आहे,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, तद्‌नुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) होय हे खरे आहे.

सन २०१६ मध्ये ९ बेपत्ता मुलींपैकी ४ मुली मिळून आलेल्या आहेत. सन २०१७ मध्ये १४ बपत्ता मुलींपैकी ४ मुली मिळून आल्या आहेत.

वरील बेपत्ता मुली ह्या कॅालेज मध्ये असलेली मैत्री, पालकांसोबत झालेल्या तक्रारी व घरगुती कारणास्तव घरातून निघुन गेल्या असून त्यांचा शोध घेण्याचे कार्य पोलीसा मार्फत चालू आहे.

(३) पोलीस तपासात जिल्हयातील वधुवर सूचक मंडळापैकी गुरू कृपा महिला मंडळ यांचेबाबत संशय आल्याने त्याची चौकशी करण्यात आली.

इतर कोणत्याही वधुवर सूचक मंडळाशी संबंधित बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) एमआयडीसी पो.स्टे. लातूर येथे दाखल गुन्हयात एकूण १० आरोपींविरूध्द गु र नं २४०/२०१७ क ३६३, ३६६, ३६६(अ), ३६७, ३७० (अ), ३७२, ३७३, १२० (ब), ३७६ (आय)(जे) (के) (एन) भादवि व बाल लैंगिक अत्यचार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ६ बाल विवाह प्रतिबंध अधिनियम सुधारमा २००६ क ९, १०, ११ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे. संबंधित गुन्हयात दोषारोप पत्र दाखल केले असुन गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच, पोलीस तपासात अल्पवयीन मुलींचे अपहरण करून अन्य जिल्हयात नेऊन लग्न लावून देऊन महिला तस्करीशी बाब निर्दशनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील विमानतळाला छत्रपती राजाराम महाराजांचे नाव देणेबाबत

**(२६) * ९६१४५ श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर विमानतळाचे “छत्रपती राजाराम महाराज विमानतळ” असे नामकरण करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे पाठविण्याचे काम प्रलंबित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्ताव केंद्र शासनाकडे तातडीने पाठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.३१.०७.२०१७ रोजीच्या निवेदनाच्या आधारे प्रस्तुत मागणी केली आहे

(२) सदर निवेदनातील विनंतीस अनुसरुन राज्य शासन स्तरावर आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत वाशिम शहरात करण्यात आलेल्या रस्त्यांचे काम निष्कृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२७) * ९९५३४ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम शहरात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत रस्त्यांच्या विकास कामासाठी रुपये ८१.५१ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला मात्र रस्त्याचे काम अतिशय निष्कृष्ट दर्जाचे करण्यात आल्यामुळे या रस्त्यावर खड्डे पडले असून ते खड्डे बुजविण्यासाठी मुरुमांचा वापर करण्यात येत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यातील खड्डे बुजवून रस्त्याचे काम चांगल्या दर्जाचे करण्याबाबत तसेच संबंधित प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** :(१) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेंतर्गत वाशिम शहरातील रस्त्यांच्या रु.८१.५१ कोटीच्या कामास माहे जानेवारी, २०१६ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

• वाशिम नगरपरिषदेने सदर कामाचे कार्यादेश माहे जुलै, २०१६ मध्ये दिले असून कामे प्रगतीपथावर आहेत.

• सद्यस्थितीत शहरातील रस्त्यांची कामे सुरु असून अद्यापपर्यंत कामे प्रगतीत आहेत. त्यामुळे रस्त्यांवर खड्डे पडले असे म्हणता येणार नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिंदे गावाजवळील (ता.खेड, जि.पुणे) अमेरिकन डाऊ कंपनीस विरोध करणाऱ्या आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत

**(२८) * ९९२३३ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंदे गावाजवळील (ता.खेड, जि.पुणे) जवळपास ११० एकर गायरान जमीन शासनाने सन २००८ मध्ये अमेरिकन डाऊ कंपनीला दिली असून सदर कंपनी त्या ठिकाणी घातक रसायनांचे उत्पादन करणार असल्याचे समजल्यानंतर तेथील स्थानिक रहिवाशी तसेच वारकरी लोकांनी कंपनीला विरोध करत आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर आंदोलन रोखण्याचा प्रयत्न पोलीस दलाने केल्याने आंदोलकांनी आक्रमक पवित्रा घेत उक्त कंपनीच्या आवारात जाळपोळ करून निषेध व्यक्त केल्याने आंदोलकांवर अनेक प्रकारचे गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामाजिक कारणास्तव केलेल्या सदर आंदोलनातील आंदोलकांवर दाखल केलेले गुन्हे मागे घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सामाजिक स्वरुपाच्या आंदोलनाचे गुन्हे मागे घेण्यासंदर्भातील शासन निर्णयानुसार उपरोक्त आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) या घटनेसंदर्भात आंदोलकांवर एकूण १३ गुन्हे दाखल आहेत. सदरचे गुन्हे मागे घेण्याबाबत प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीपुढे ठेवण्यात आले असता त्यापैकी २ गुन्हे मागे

घेण्याबाबत जिल्हास्तरीय समितीची मंजूरी मिळाली व ३ गुन्हे नामंजूर करण्यात आले. तर १ गुन्हा अ फायनल करण्यात आलेला आहे. ४ गुन्हे सीआरपीसी ३२१ प्रमाणे काढून घेण्यात आलेले आहेत. ३ गुन्हयांच्या कागदपत्रांची छाननी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कौशल्य विकास विभागातील रिक्त पदांमुळे व्यावसायिक प्रशिक्षणापासून विद्‌यार्थी वंचित राहत असल्याबाबत

**(२९) * ९५१७० श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्‌योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने, कौशल्य विकास विभागातील शिक्षकांच्या ११४६ रिक्त पदांसाठी दिनांक २९ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये उमेदवारांसाठी नमूद केलेली शैक्षणिक अर्हता सेवा प्रवेश नियमाप्रमाणे नसल्याने, जाहिरातीबाबत संपूर्ण राज्यभरातून तक्रारी प्राप्त झाल्यानंतरही तत्कालीन प्रभारी कौशल्य विकास संचालक तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सहसचिव यांनी चुकीच्या शैक्षणिक पात्रतेनुसार ६८ हजार उमेदवारांची लेखी परिक्षा घेतली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जाहिरात दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास रद्द करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षक भरती प्रक्रिया सुरू होवून तीन वर्षे झाल्यानंतरही कौशल्य विकास विभागातील ६८० शिक्षकांची पदे अद्‌यापही भरली गेली नसल्यामुळे प्रत्येक वर्षी १४ हजार याप्रमाणे मागील तीन वर्षात अनेक विद्‌यार्थी कौशल्य विकास प्रशिक्षणापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून कौशल्य विकास विभागातील शिक्षकांची भरती तातडीने करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) अंशत: खरे आहे.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत असलेल्या संस्थांमधील शिक्षकीय व शिक्षकेत्तर नियमित वेतनश्रेणीतील ७०२ पदांची व ठोक वेतनावरील ४३० पदांची अशी एकूण ११३२ पदांची पदभरतीची जाहिरात दिनांक २९.८.२०१४ व दिनांक १३.९.२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, ठोक वेतनावरील सुरु असलेल्या तुकडयांसाठी संलग्नता प्राप्त नसल्याने, ठोक वेतनावरील ४३० पदांची जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर भरती प्रक्रियेआधीच रद्द केली आहे. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने ५५८८० इतक्या उमेदवारांची लेखी परीक्षा दिनांक २२.११.२०१५ रोजी घेण्यात आली होती.
(२) शिल्प निदेशक पदाच्या सेवाप्रवेश नियमा संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेली रिट याचिका क्रमांक ११०५५/२०१६ च्या दिनांक २२.८.२०१७ च्या न्यायालयीन आदेशाद्वारे फक्त शिल्प निदेशक पदासाठीची दिनांक २९ ऑगस्ट, २०१४ रोजीची जाहिरात रद्द करण्यात आलेली आहे.

दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत कोणतीही जाहीरात देण्यात आलेली नाही.
(३), (४) व (५) प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून संस्थास्तरावरील शिल्प निदेशकांच्या रिक्त पदांवर तासिका तत्वावर / कंत्राटी तत्वावर पर्यायी शिक्षकांची नेमणूक करण्यात आली असून, विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरु आहे. कोणताही विद्यार्थी कौशल्य विकास प्रशिक्षणापासून वंचित राहिलेला नसल्यामुळे चौकशी करण्यात आलेली नाही.

-----------------

## खोपोली (जि.रायगड) शहरात ठिकठिकाणी पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्यामुळे डेंग्यू व मलेरियाचा प्रादुर्भाव वाढल्याबाबत

**(३०) * ९७६१९ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली शहरात (जि.रायगड) ठिकठिकाणी पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी व अस्वच्छता पसरुन डेंग्यू व मलेरियाचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक जनतेने तसेच सामाजिक संघटनांनी खोपोली नगरपरिषद तसेच शासनाच्या आरोग्य विभागाकडे या संदर्भात माहे सप्टेंबर, २०१७ वा त्या दरम्यान पासून अनेक तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने तसेच स्थानिक प्रशासनाने कोणतीही उपाययोजना केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) खोपोली शहरात सप्टेंबर, २०१७ व ऑक्टोबर, २०१७ दरम्यान डेंग्यु व मलेरियाची लागण झालेले एकूण तीन रुग्ण आढळले आहेत.

(२) होय.

अशा प्रकारच्या तक्रारी खोपोली नगरपरिषदेस प्राप्त झाल्या होत्या.

(३) व (४) खोपोली नगरपरिषद व सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत खबरदारी म्हणुन खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत असल्याचे कळविले आहे :-

- डेंग्यु रक्त तपासणी करीता सामान्य रूग्णालय, अलिबाग येथे सेंटीनल सेंटरची स्थापना करण्यात आली.

- नियमित ताप सर्व्हेक्षण व रक्त नमुने गोळा करण्यात येतात.
- किटक समाहरकांमार्फत किटकशास्त्रीय सर्व्हेक्षण व प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.
- शहरामध्ये स्वच्छता मोहिम जनजागृतीसाठी हस्तपत्रके वाटण्यात आली.
- एडिस डास प्रतिबंधासाठी अळीनाशक फवारणी व धुर फवारणी तसेच एडिस डासाच्या उत्पत्ती होणाऱ्या पाणीसाठ्याची नियमित तपासणी व एडिस डास निर्मिती होणाऱ्या ठिकाणची तपासणी करून विल्हेवाट लावण्याबाबत जनजागृती व ॲबेटींग करणे.
- जिल्हा हिवपात अधिकारी, रायगड यांनी डेंग्यु, मलेरियाबाबत मार्गदर्शनपर सभा आयोजित केली होती.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेतील विधी व सल्लागार विभागातील अधिकारी व कर्मचारी संगनमताने गैरव्यवहार करीत असल्याबाबत

**(३१) * ९९९७० श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेतील विधी व सल्लागार अधिकारी व कर्मचारी संगनमताने काही विशिष्ट लोकांना आर्थिक व्यवहारात सहाय्य करुन गैरव्यवहार करित असल्याने महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिकेतील विधि विभागातील अधिकाऱ्यांविरोधात मा.विधानसभा सदस्य यांनी दि.९.८.२०१७ रोजी तक्रार केलेली होती हे खरे आहे.

(२) व (३) सदर तक्रार यथाशिघ्र चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी पुणे महानगरपालिकेस पाठविण्यात आली असून त्याचा अहवाल लवकरच अपेक्षित आहे.

-----------------

## कोल्हापूर शहरातील नगरोत्थान योजनेतील कामे प्रलंबित असल्याबाबत

**(३२) * १००२७१ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील रस्त्यांसाठी सन २०११ मध्ये नगरोत्थान योजनेतून १०८ कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊन अद्यापपर्यंत ही योजना पूर्ण झाली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजना पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत याची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार उपरोक्त योजना तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (राज्यस्तर) अंतर्गत कोल्हापूर महानगरपालिकेच्या रु.१०८.११ कोटीच्या रस्ते प्रकल्पास माहे ऑगस्ट, २०१० मध्ये प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे.
• प्रस्तुत प्रकल्पात समाविष्ट कामांपैकी ८५ टक्के कामे पूर्ण झाली असल्याचे कोल्हापूर महानगरपालिकेने कळविले आहे.
(२), (३) व (४) • कोल्हापूर महानगरपालिकेने प्रकल्पाच्या निविदा ४ पॅकेजमध्ये काढल्या होत्या.
• त्यापैकी दोन ठेकेदारांनी विहीत मुदतीत कामे पूर्ण न केल्याने त्यांना काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही कोल्हापूर महानगरपालिकेने केली आहे.

• सदर कामाची फेर निविदा काढून नेमलेल्या नविन ठेकेदाराकडून कामे करुन घेण्यात येत असून डिसेंबर, २०१७ अखेर पर्यंत कामे पूर्ण करण्याचे कोल्हापूर महानगरपालिकेचे नियोजन आहे.

-----------------

## ई-लर्निंग प्रकल्पासाठी काढण्यात आलेल्या निविदेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३३) * १०००५६ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ई-लर्निंग प्रकल्पातील डिजिटल अभ्यासक्रमास राज्य मंडळाचा अभ्यासक्रम तयार करणाऱ्या बालभारतीची मान्यता नसूनसुद्धा स्थायी समितीकडून महानगरपालिका शाळांमध्ये ई-लर्निंग प्रकल्पासाठी रुपये २१ कोटी खर्च करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका शाळांमध्ये ई-लर्निंग प्रकल्पासाठी प्रथमत: रुपये २४ कोटीची निविदा काढण्यात आली मात्र त्यास विरोध झाल्यामुळे सदर निविदा कमी करून रुपये २१ कोटीची निविदा मान्यतेसाठी स्थायी समितीसमोर ठेवण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मूळ प्रस्ताव मांडताना रु. २४ कोटी व विरोधानंतर रु.२१ कोटी म्हणजे रुपये ३ कोटी कमी झाले असून मूळ प्रस्तावात वाढीव रक्कम ठेवण्यात आल्याने निविदेत गैरव्यवहार झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिका शाळांमधील सुविधा सुधारणे आवश्यक असताना अशाप्रकारे गैरव्यवहार करणाऱ्या संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षात पुणे महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग प्रणाली, व्हर्च्युअल क्लासरूम, डिजीटल क्लासरूम व अडॅप्टीव्ह लर्निंग मॅनेजमेंट सिस्टिम योजना राबविण्यासाठी रूपये २४ कोटी ४९ लक्ष एवढ्या रकमेच्या खर्चाचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला होता, परंतु त्यास मान्यता मिळू शकली नाही.

तथापि, सदर प्रस्तावातील दर जादा असल्याने फेरतपासणीअंती सुधारीत रूपये २०.९९ कोटीचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला.

सदरच्या सुधारित रकमेच्या खर्चाच्या फेरप्रस्तावास स्थायी समितीने दि.२५.१०.२०१७ रोजी मान्यता दिली आहे, हे खरे आहे. अद्याप या कामाचे कार्यादेश दिलेले नाहीत.

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी बालभारतीने प्रमाणित केलेले सॉफ्टवेअर ई-लर्निंगसाठी खरेदी करण्याबाबत सूचित केले होते. तथापि सद्यस्थितीत बालभारतीकडे सदरचे सॉफ्टवेअर प्रमाणित करून देण्याची सुविधा उपलब्ध नाही.

(३), (४) व (५) ई-लर्निंग प्रणालीबाबतच्या प्रकरणी चौकशी करण्याबाबत दि.२१.७.२०१७ च्या शासन पत्रान्वये पुणे महानगरपालिकेस कळविण्यात आलेले असून त्याचा अहवाल लवकरच अपेक्षित आहे.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथे महानगरपालिकेच्या किटकनाशक टँकरमध्ये झालेला स्फोट

**(३४) * ९५२२३ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथे उघड्यावर असलेल्या महानगरपालिकेच्या किटकनाशक टँकरमध्ये दिनांक १७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास स्फोट होऊन एका विद्यार्थ्याचा मृत्यू व तीन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर घटनेत मृत पावलेल्या विद्यार्थ्याच्या कुटूंबियांना तसेच जखमींना उपचारासाठी कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पिण्याच्या पाण्याच्या टाकीजवळ प्रतिबंधित क्षेत्रात असलेल्या किटकनाशकाच्या ड्रमचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत दिनांक १७ सप्टेंबर, २०१७ रोजी, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला व दोन विद्यार्थी जखमी झाले ही वस्तुस्थिती आहे.
(२) सदर प्रकरणी उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, काही मुलांनी लावलेल्या आगीमुळे किटकनाशक ड्रमचा स्फोट झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी उल्हासनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २१७/२०१७, भादंवि कलम ३०४(अ), ३३७ अन्वये दिनांक ०६.१०.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर दुर्घटनेतील मृत विद्यार्थ्याच्या मृत्युपूर्वी त्याच्यावर करण्यात आलेल्या उपचाराच्या खर्चापोटी रु.३,३०,०००/- व त्याच्या मृत्युनंतर त्याच्या कुटुंबियांना रु.५ लाख इतकी आर्थिक मदत उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत मंजूर करण्यात आली आहे.

रकमेपैकी रु. ५ लाख इतक्या रकमेचा धनादेश मृत विद्यार्थ्याच्या कुटुंबियांना दिनांक ३०.११.२०१७ रोजी देण्यात आला असून, वैद्यकीय उपचाराकरिता देय असलेली रु. ३,३०,०००/- इतकी रक्कम देयकाची तपासणी करुन देण्यात येणार आहे.

उर्वरित २ जखमी विद्यार्थ्यांच्या औषधोपचाराकरिता करण्यात आलेला वैद्यकीय खर्चाचे रु. ३५,०००/- चे देयक देण्याची कार्यवाही उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानखुर्द (पुर्व), मुंबई येथील महात्मा ज्योतीबा फुले सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील पात्र सभासदांना सदनिकांचे वाटप करण्याबाबत

**(३५) * ९५५७३ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतीबा फुले सहकारी गृहनिर्माण संस्था, महाराष्ट्र नगर, मानखुर्द (पुर्व), मुंबई या संस्थेमधील जुन्या सभासदांना डावलून नवीन सभासदांना सदनिकांचे वाटप झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गृहनिर्माण संस्थेमध्ये सदनिका मिळण्याकरिता प्रत्येक सभासदांनी रुपये २ लाख २५ हजार भरलेले असून देखील अद्यापपर्यंत अनेक सभासदांना सदनिकांचे वाटप करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सदनिका वाटप प्रकरणात संस्थेचे संस्थापक व संस्थेचे मुख्य प्रवर्तक यांनी कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन जुन्या व पात्र सभासदांना सदनिका देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) शासन निर्णय दि.७ ऑक्टोबर,२००६ मधील तरतुदी आणि तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावर दि.४.६.२००८ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार सदरहू संस्थेला ताबा दिलेला आहे. त्यातील ११२८ सदनिकांचे वाटप त्या संस्थेने जुन्या अथवा नवीन यापैकी कोणत्या सभासदांना केले त्याची माहिती पाठपुरावा करुनही त्या संस्थेने सादर केलेली नाही. तसेच सदर शासन निर्णयानुसार संबंधित भूखंडावरील झोपडपट्टीवासियांना रु.२ लाख भरल्यावर त्या सदनिकांचे वाटप त्यांनाच करणे अपेक्षित होते. त्या झोपडपट्टीवासी सभासदांना त्या सदनिकांचे वाटप

केले किंवा नाही, त्याची देखील माहिती संस्थेकडून प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सदर प्रश्नाबाबत सद्य:स्थितीत ठोस निष्कर्ष काढता येत नाही. वस्तुत: उपरोक्त शासन निर्णयानुसार सदनिका वितरणाची जबाबदारी संस्थेकडे देण्यात आली होती.

(३) सदनिका वाटप प्रकरणात गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी पोलिस विभागाकडून प्राप्त झाल्या होत्या. त्याबाबत शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितकडील माहिती पोलिस स्टेशनला कळविलेली आहे.

(४) व (५) मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र.३७/२०१४ वर मा.उच्च न्यायालयाने दि.१ मार्च,२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे सुनावणी सुरु आहे. त्यातील निष्कर्ष प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करणे योग्य होईल, त्यामुळे विलंब होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिठेखार (ता.मुरूड, जि.रायगड) येथे प्रवासी वाहतुकीसाठी जेट्टी बांधण्याबाबत

**(३६) * ९५७७७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील मिठेखार, साळाव, चेहरे, निडी परिसरातील प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी मिठेखार येथे प्रवासी वाहतुकीसाठी जेट्टी बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.राज्यमंत्री बंदरे यांच्याकडे माहे जुलै २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरातील नागरीक दळणवळण व व्यापाराकरिता अलिबाग तालुक्यातील सुडकोली येथे जाण्यासाठी अनेक वर्षांपासून होडीने प्रवास करीत असून सुडकोली पर्यंतचे अंतर ३५ कि.मी असल्यामुळे प्रवासास अधिक वेळ लागणे, लाखो लिटर इंधन वाया जाणे, इत्यादी अडचणींमुळे हा प्रवास प्रवाशांना खर्चिक व त्रासदायक ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मिठेखार येथून सुडकोली येथे जाण्यासाठी फार वर्षांपूर्वी बांधण्यात आलेली प्रवासी जेट्टी उद्ध्वस्त झाल्यामुळे ओहोटीच्या वेळी प्रवाशांना विशेषत: रूग्ण, ज्येष्ठ नागरिक व महिलांना चिखलातून ये-जा करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेता मिठेखार येथे प्रवासी जेट्टी बांधण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर ठिकाणी सद्यस्थितीत प्रवासी वाहतूक होत नाही.

(३) मिठेखार येथे पाहणी केली असता त्या ठिकाणी प्रवासी जेट्टी नाही. सदर ठिकाणाहून सद्यस्थितीत दळणवळणाकरीता रोडमार्गे सुडकोलसी, चेहरे, साळाव व निडी येथे जाण्यासाठी रोहा मार्गे तसेच रेवदंडा वावे मार्गे जाण्यासाठी पर्याय आहेत.

त्याचप्रमाणे जलमार्गे प्रवास करावयाचा असल्यास मिठेखार पासून २ कि.मी. अंतरावर साळाव येथे प्रवासी जेट्टी उपलब्ध आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कशेळी-काल्हेर, भिवंडी, दिवा-मुंब्रा (जि.ठाणे) येथे खारफुटीवर भराव टाकून बांधण्यात येणाऱ्या अनधिकृत बांधकामांबाबत

**(३७) * ९५७५८ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेलगत (जि.ठाणे) असलेल्या कशेळी-काल्हेर या गावात खारफुटीवर भराव टाकून बांधण्यात येणाऱ्या २०० अनधिकृत बांधकामांसंदर्भात एम.एम.आर.डी.ए.ने केवळ नोटीस बजावण्याचे काम केले असून या विभागात अनेक अनधिकृत बांधकामे होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले, तद्नुसार कशेळी-काल्हेर व भिवंडी तालुक्यात तसेच दिवा-मुंब्रा भागात खारफुटीवर भराव करून अनधिकृत बांधकामे करणाऱ्या विकासकांवर व त्यांना अभय देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मौजे काल्हेर व कशेळी गावांमधील सी.आर.झेड. बाधित जमिनींवरील ९२ अनधिकृत बांधकामांबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(१) अन्वये संबंधित जमीन मालक/विकासक/ बांधकामधारक यांना नोटीस बजावल्या असून त्यापैकी ६९ प्रकरणे निष्कासनाचा कार्यवाही प्रस्तावित केली असून ६३ प्रकरणांमध्ये पोलीस बंदोबस्त मिळणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. त्यानुषंगाने एक बांधकाम निष्काशित करण्यात आले आहे. उर्वरित २३ प्रकरणांसंदर्भात छाननीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(२) व (३) महसूल व वन विभागाने कांदळवनाची तोड व ऱ्हास थांबविण्याच्या दृष्टीने तसेच वेटलँड/पाणथळ क्षेत्राचा नाश होऊ नये म्हणून प्राप्त होणाऱ्या तक्रार अर्जांचे निराकरण करण्यासाठी भिवंडी तालुक्यासाठी तहसिलदार, भिवंडी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती नेमण्यात आली असून मा. विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली कांदळवन तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली आहे.

-----------------

## मालेगाव (जि.नाशिक) महानगरपालिका येथे सुवर्ण जयंती रोजगार योजनेत होत असलेला गैरव्यवहार

**(३८) * ९८४०९ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) महानगरपालिका येथे सुवर्ण जयंती रोजगार योजनेच्या नावाखाली महिला बचतगट स्थापन करून उक्त बचत गटांना

मिळणाऱ्या शासनाच्या विविध सुविधा उपलब्ध न करुन देता महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांनी त्या सुविधा उपभोगल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) तथापि, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेची पुर्नरचना करुन राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानात रुपांतर करण्यात आले असून सद्य स्थितीत राज्यात केंद्र पुरस्कृत दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानाअंतर्गत स्वयं सहाय्यता गट स्थापन करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाची संसाधन संस्था म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे.

त्याअंतर्गत स्वयं सहाय्यता गटांची स्थापना करण्यात येऊन प्रति गटास रुपये १० हजार इतका फिरता निधी उपलब्ध करुन दिला जातो.

मालेगाव महानगरपालिका क्षेत्रात सन २०१५-१६ ते आतापर्यंत २०२ स्वयं सहाय्यता गटांना फिरता निधी उपलब्ध करुन दिला आहे.

वरील सुविधा महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांनी उपभोगल्या नसल्याचे मालेगाव महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबड (जि.जालना) शहरामधील भुयारी गटार योजनेच्या कामासंदर्भात उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्याबाबत

**(३९) * १०११९१ श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड (जि.जालना) शहरामधील भुयारी गटार योजनेच्या कामासंदर्भात उच्चस्तरीय चौकशी समिती नेमणे व उक्त काम पूर्ण करण्याचे आदेश देण्यात यावेत याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी (बदनापूर-अंबड) यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदन सादर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.मुख्यमंत्र्यांनी चौकशीचे आदेश देऊनही याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंबड शहरातील भुयारी गटार योजनेची उच्चस्तरीय चौकशी समिती नेमणे व काम पूर्ण करण्याचे आदेश देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना डिसेंबर, २०१६ मध्ये निवेदन दिले होते, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत सूचना आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन यांना दिल्या होत्या.

त्यानुसार त्यांनी त्यांचा अहवाल शासनास सादर केला आहे.

(३) उपरोक्त चौकशी अहवालावर शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

• अंबड शहर भुयारी गटार प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये गैरव्यवस्थापनास जबाबदार असणाऱ्या अंबड नगरपरिषदेच्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर दोषारोप बजावण्याची कार्यवाही नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून करण्यात येत आहे.

• सदर अनियमिततेच्या अनुषंगाने पदाधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

• प्रकल्पाच्या गैरव्यस्थापनास जबाबदार असणाऱ्या तांत्रिक सल्लागारास काळ्या यादीत टाकण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, जालना व मुख्याधिकारी, नगरपरिषद, अंबड यांना सूचना दिल्या आहेत.

• प्रकल्पाची कामे लवकर पूर्ण करण्यासंदर्भात मुख्याधिकारी, नगरपरिषद, अंबड यांना सूचना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहात कैद्यांचे झालेले मृत्यु

**(४०) * ९७६९० श्री.शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहात माहे फेब्रुवारी, २०१४ ते दिनांक ५ जुलै, २०१७ या कालावधीत ३२ कैद्यांचा संशयास्पद मृत्यु झाल्याची घटना नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच मृत पावलेल्या कैद्यांच्या कुटुंबियांना/वारसांना अर्थसहाय्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

नागपूर मध्यवर्ती कारागृहामध्ये माहे फेब्रुवारी, २०१४ ते जुलै,२०१७ या कालावधीत ३२ कैद्यांचा झालेला मृत्यु शासकीय महाविद्यालय व रुग्णालय/ कारागृह रुग्णालय, नागपूर येथे उपचारादरम्यान झालेला आहे.
(२) बंदी कारागृह रुग्णालय/शासकीय रुग्णालय येथे मृत पावल्यास संबंधीत पोलीस स्टेशन येथे त्याबाबत आकस्मीक मृत्यु नोंद दाखल करण्यात येते. तसेच बंद्याचे नातेवाईक यांना बंद्याच्या मृत्युबाबत तात्काळ कळविण्यात येते. मृत्युची खबर मा. राष्ट्रीय मानवी हक्क आयोग व राज्य मानवी हक्क

आयोग, शासन कारागृह मुख्यालय, इतर वरिष्ठ कार्यालय व संबंधीत न्यायालय यांना कळविण्यात येते. त्याचप्रमाणे मा.कार्यकारी दंडाधिकारी/मुख्य न्यायदंडाधिकारी यांचेमार्फत इन्क्वेस्ट पंचनामा करण्यात येतो. त्यानंतर मृत बंद्यांची जिल्हा दंडाधिकारी व न्याय दंडाधिकारी यांचेमार्फत चौकशी करण्यात येते. तसेच बंदी मृत्युबाबत चौकशी अहवाल संबंधीत प्राधिकरण यांचेमार्फत तात्काळ मा. राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई व मा.राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, दिल्ली यांचेकडे सादर करण्यात येतात.

माहे फेब्रुवारी २०१४ ते ५ जुलै,२०१७ या कालावधीत ३२ कैद्यांचा संशयास्पद मृत्यु झाला नसून सदरचे बंदी उपचारादरम्यान कारागृह रुग्णालय/शासकीय रुग्णालयात मृत पावलेले आहेत. सदर मृत पावलेल्या बंद्यांपैकी १० बंद्यांचा उपचारादरम्यान नैसर्गिक मृत्यु झाल्याचा जिल्हादंडाधिकारी चौकशी अहवाल मा.राष्ट्रीय/राज्य मानवी हक्क आयोगास सादर करण्यात आला असून उर्वरित २२ मृत बंद्याबाबत त्यांचेकडून अहवाल अजून अप्राप्त आहे. प्रस्तुत प्रकरणी कोणीही अधिकारी/कर्मचारी दोषी आढळून न आल्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. माहे फेब्रुवारी, २०१४ ते ५ जुलै, २०१७ या कालावधीत मृत पावलेल्या बंद्यांच्या कुटुंबियांना/ वारसांना शासनाकडून अर्थसहाय्य देण्यात आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईहून कोल्हापूरला जाणाऱ्या महालक्ष्मी एक्सप्रेसला जेजुरीजवळ अडवून प्रवाशांचा ऐवज लुटल्याबाबत

**(४१) * ९८०१९ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंग्नल यंत्रणेत बिघाड करुन मुंबईहून कोल्हापूर ला जाणाऱ्या महालक्ष्मी एक्सप्रेसला जेजुरीजवळील राजेवाडी स्थानकाजवळ अडवून प्रवाशांचे २ लाख रुपयांचे ऐवज लुटून नेल्याची घटना दिनांक २६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेल्वेने पोलीस संरक्षण ठेवले नसल्याने प्रवाशांना तक्रार करण्यासाठी मिरज व कोल्हापूर येथे जावे लागले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या घटनेबाबत पोलीसांनी गुन्हा नोंदवून याबाबतची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. पुणे ते मिरज रेल्वे स्थानकादरम्यान निरा, लोणंद, वाठार, सातारा रेल्वे स्थानकावर रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी रेल्वे पोलीसांची नियुक्ती केलेली आहे. सदर गुन्हा घडल्यानंतर लागलीच सातारा येथे नियुक्त रेल्वे पोलीसांकडून गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही सुरू केली. तथापि सदर गुन्ह्याची सविस्तर तक्रार फिर्यादी यांनी सातारा येथील पोलीसांना न देता मिरज रेल्वे पोलीस ठाणे या ठिकाणी दिलेली आहे. मिरज रेल्वे पोलीस ठाणे देखील पुणे लोहमार्ग जिल्ह्याचे कार्यक्षेत्रात येत असल्याने त्यांनी वेळीच घटनेची दखल घेऊन गुन्ह्याचा तपासास सुरूवात केली आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथे अज्ञात आरोपीविरोधात गु.र.नं. ६४१/२०१७ भादंवि कलम ३७९, ३५६ व भा.रे.का. १७४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हा तपासावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंदी (रेल्वे) नगरपरिषद (जि.वर्धा) येथील रेस्ट हाऊस ते रेल्वे स्थानक पर्यंतच्या रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४२) * ९८८५४ श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदी (रेल्वे) नगरपरिषद (जि.वर्धा) येथील रेस्ट हाऊस ते रेल्वे स्थानक पर्यंत तयार करण्यात आलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याने उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांच्याकडे तक्रार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सिंदी (रेल्वे) नगरपरिषद जि.वर्धा येथील रेस्ट हाऊस ते रेल्वे स्थानकापर्यंत तयार करण्यात आलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबतचा तक्रार अर्ज लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राप्त झाला असून सदर अर्जाच्या अनुषंगाने अर्जात नमूद अर्जदार यांच्याशी संपर्क करण्यात आला असता सदरचा तक्रार अर्ज त्यांनी दिलेला नसल्याबाबत अर्जदाराने सांगीतले आहे. तथापी सदर प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर परिक्षेत्र कार्यालयाकडून पडताळणी करण्यात येत आहे.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांची विशेष तपास पथकाकडून चौकशी करण्याबाबत

**(४३) * ९८५६०  श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :**  सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.ता.चिपळूण (जि.रत्नागिरी) नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ.पंकज पाटील यांच्या गैरकारभाराची व त्यांच्याविरुध्द जनतेकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची विशेष तपास पथकाकडून चौकशी करण्यात येवून त्यांची तातडीने बदली करण्यात यावी अशी लेखी मागणी रत्नागिरी जिल्हयाचे पालक मंत्री यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे केल्याची बाब दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालकमंत्री (जि.रत्नागिरी) यांनी मा.मुख्यमंत्री यांना पाठविलेल्या पत्रात, जिल्हा वार्षिक योजना नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत चिपळूण शहरातील रस्ते दुरुस्तीच्या व चिपळूण बाजारपुलाच्या कामात सदरहू मुख्याधिकाऱ्यांनी लाखो रूपयांचा गैरव्यवहार केल्याचे तसेच इतरही आरोप केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चिपळूण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ.पंकज पाटील यांच्या गैरकारभाराची विशेष तपास पथकाकडून तातडीने चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) • अशा आशयाची तक्रार राज्यमंत्री गृहनिर्माण, उच्च व तंत्रशिक्षण तथा पालकमंत्री, रत्नागिरी जिल्हा यांनी केली आहे, हे खरे आहे.
(३) व (४) • सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल यथाशीघ्र सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुळा-प्रवरा वीज सहकारी संस्थेने दुष्काळग्रस्तांसाठी दिलेल्या अनुदानाचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(४४) * ९५९२४ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुळा-प्रवरा वीज सहकारी संस्थेने दुष्काळग्रस्तांसाठी असलेले सुमारे १७ कोटी रुपयांचे शासकीय अनुदान दुष्काळग्रस्तांना वाटप न करता त्याचा गैरवापर केल्याचे माहे नोव्हेबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, तद्नुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) दि मुळा प्रवरा इलेक्ट्रिक को-ऑप. सोसायटी लि., श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर या संस्थेच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालात ".....संस्थेने दुष्काळग्रस्त वीज ग्राहकांना रुपये १७.६२ कोटी परत न करता कंझ्युमर कॉनट्रीब्युशन या खाती वर्ग केली आहे. परंतु ही रक्कम महाराष्ट्र शासनास परत करावी किंवा ग्राहकांच्या खाती वर्ग करावेत" ह्या शेऱ्याच्या अनुषंगाने, श्रीरामपूर पोलीस स्टेशन, श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर येथे या प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधितावर योग्य कारवाई करण्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे. या संदर्भात जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा अहमदनगर यांच्या आदेशानुसार, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर यांच्याकडून चौकशी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट या कंपनीकडून खाजगी कंपन्यांवर कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येत असल्याबाबत

**(४५) * १००४०८ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिकेच्या ठरावानुसार स्थापन करण्यात आलेल्या पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट या कंपनीकडून खाजगी कंपन्यांवर कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येत असून स्मार्ट सिटी कंपनीचे कार्यालय व प्रकल्प याकरिता महानगरपालिकेच्या अनेक जागा व मालमत्ता वापरल्या जात असतानाही स्मार्ट सिटी कंपनीकडून पुणे महानगरपालिकेला कोणतेही भाडे अदा करण्यात येत नसल्याने महानगरपालिकेचे दरमहा लाखो रुपयांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या सूचनेनुसार रूपये २ कोटी द्यावयाचे असताना मेकन्झी या कंपनीला रूपये २ कोटी ६० लाख देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपनीची ३० महिन्यांसाठी रूपये ३८ कोटी २६ लाख देऊन स्मार्ट सिटीच्या विविध प्रस्तावित प्रकल्पांसाठी सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असतानाही स्मार्ट सिटीची विविध विकास कामे ठप्प झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डिजिटल फलकाचा वापर करणाऱ्या जाहिरात एजन्सीकडून महानगरपालिका वार्षिक शुल्क आकारते परंतु स्मार्ट सिटी कंपनीकडून महानगरपालिका क्षेत्रात उभारण्यात आलेल्या डिजिटल फलकांकरिता महानगरपालिकेला जाहिरात शुल्क देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

• पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी राज्य शासन व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त मालकिची आहे.

• केंद्र शासन, राज्य शासनाच्या मान्यतेनुसार व स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कंपनी, आर्टीकल ऑफ असोसिएशन अॅन्ड मेमोरँडम मधील तरतुदी नुसार स्मार्ट सिटी पुणे कंपनीचे कार्यालय हे पुणे महानगरपालिकेच्या इमारतीत राहणार असल्याने भाडे देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) हे खरे नाही.

• स्मार्ट सिटी योजनेसाठी प्रस्ताव तयार करण्यासाठी केंद्रशासनाने विहित केलेल्या ११ सल्लागारांच्या यादीतील मे. मेकेन्झी अॅन्ड कंपनी यांची रु.२.५० कोटी व विहीत दराने सेवाकर अशी निविदा पुणे महानगरपालिकेकडून स्वीकारण्यात आली होती.

• त्यानुसार त्यांना रु.२.५० कोटी व सेवाकर रक्कम रु.३६ लाख मिळून एकूण रक्कम रु. २.८६ कोटी अदा करण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

• पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीकडून एकूण ३५ कामे प्रस्तावित आहेत.

• या ३५ कामांपैकी ४ कामे पुर्ण झाली आहेत, उर्वरीत ३१ कामांपैकी ७ कामे सुरु करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत, ४ कामांच्या निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत, ११ प्रकल्पांचे डीपीआर प्रगतीपथावर आहेत तथा ९ प्रकल्पांची कामे अद्याप सुरु व्हावयाची आहेत.

(४) व (५) हे खरे नाही.

• स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कंपनीकडून महापालिका क्षेत्रात उभारण्यात आलेले डिजीटल फलक हे नागरीकांसाठी रहदारीच्या सूचना, पर्यावरण विषयक आकडेवारी आणि इतर समाजपयोगी सूचना याकरीता वापरले जात असून त्यावर व्यावसायिक जाहिरात केली जात नाही.

• त्यामुळे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कंपनीला डिजीटल फलकाप्रित्यर्थ कोणतेही शुल्क प्राप्त होत नाही.

• जर या डिजीटल फलकांचा वापर व्यावसायिक जाहिरातीकरीता केला जाणार असेल तर त्यावेळी पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी पुणे महानगरपालिकेशी त्याकरीता संपर्क साधून नियमानुसार देय होणारे जाहिरात शुल्क देण्याबाबत कार्यवाही करेल.

• सध्या या डिजीटल फलकांसाठी महानगरपालिकेला शुल्क देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बालकांचे अपहरण करून त्यांची विक्री करणाऱ्यांना ठाणे गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केल्याबाबत

**(४६) * ९७६४५ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालकांचे अपहरण करून त्यांची विक्री करणाऱ्या आठ जणांना ठाणे गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक २४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच भविष्यात बालकांच्या अपहरणास प्रतिबंधित करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वागळे इस्टेट पोलीस स्टेशन येथे ९ आरोपींविरूध्द गु.र.क्र. १८४/२०१७, भा.द.वि.सं. कलम ३६१, ३६३, ३६५, ३६७, ३६८, ३७०, ३७२ सह बाल न्याय अधिनियम कलम ७५, ८१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
सदर प्रकरणी दोषारोपपत्र दाखल करण्यात येवुन प्रकरण सद्यस्थितीत न्यायाप्रविष्ठ आहे.
त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या गुन्ह्यांना प्रतिबंध होण्याच्या दृष्टीने समाजातील नागरिकांना आपले पाल्यांची काळजी घेणेबाबत वेगवेगळ्या माध्यमातुन जनजागृती करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडावर पुनर्विकास आणि इमारत बांधकाम प्रकल्पांकरिता देय असलेले प्रीमियम विकासकांनी थकविल्याबाबत

**(४७) * ९५५६३ श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अमित साटम (अंधेरी**

**पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडावरील संपादित व भाडेकरु मालमत्तांच्या १२३ पुनर्विकास प्रकल्पांना विकास नियंत्रण नियमावली विनिमय ३३(७) अन्वये मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी ४१ प्रकल्प पूर्ण झाले असून २० प्रकल्पांचे काम पूर्ण करण्यासाठी दिलेला कालावधी संपल्यानंतरही विकासकांनी मागील ९ वर्षात प्रिमीयमपोटी (एस.आर.ए आणि खाजगी प्रकल्पात) मुंबई महानगरपालिकेला देय असलेले रुपये ४०० कोटी दिले नसल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्विकासाच्या नवीन धोरणानुसार २०% रक्कम कराराचे वेळी, ६०% रक्कम प्रकल्पाचे काम सुरु असताना आणि उर्वरित २०% रक्कम ही भोगवटा प्रमाणपत्र घेताना भरावयाची आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार विकासकांकडून प्रिमीयमपोटी ४०० कोटी रुपये वसूल करण्याबाबत तसेच प्रिमियम थकविणाऱ्या विकासकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर बाब बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भूभागावरील संपादित/भाडेकरु मालमत्तांच्या पुनर्विकासाशी निगडीत असून, सदर मालमत्तांच्या एकूण १२३ पुनर्विकास प्रकल्पांना विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मंजुरी देण्यात आली आहे.

त्यापैकी ४१ पुनर्विकास प्रकल्प पूर्ण झाले असून, तेथील भाडेकरुंचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यात आले आहे.

उर्वरित ८२ प्रकल्पांतील पुनर्वसन इमारतींचे बांधकाम तसेच विकासकाच्या विक्रीयोग्य इमारतींचे बांधकाम सुरु आहे.

सदर १२३ पुनर्विकास प्रकल्पांमधून बृहन्मुंबई महानगरपालिकेस रु.१२४०.१३ कोटी प्राप्त होणे अभिप्रेत असून, ३४ प्रकल्पांमध्ये भांडवली मुल्य निरंक आहे.

उर्वरित ८९ प्रकल्पांमधून महानगरपालिकेस रु. ८४६.९९ कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली असून, रु.३९३.२३ कोटी इतक्या रकमेची वसुली करण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(२) पुनर्विकास प्रकल्पात भांडवली मुल्य वसुल करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रचलित धोरण खालीलप्रमाणे आहे :-

• २०% इरादापत्र निर्गमित करण्यापूर्वी,

• ६०% विक्री इमारतीस बांधकामाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यापूर्वी व

• २०% इमारतीच्या भोगवटा प्रमाणपत्रास ना-हरकत देण्यापूर्वी

सदर धोरणात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २३.११.२०१७ रोजी सुधारणा करण्यात आली असून, नवीन धोरण खालीलप्रमाणे आहे :-

• ५% भांडवली मुल्य इरादापत्र निर्गर्मित करण्यापूर्वी,

• १५% भांडवली मुल्य विक्रीयोग्य इमारतीस बांधकाम सुरु करण्याच्या दाखल्यास ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यापूर्वी किंवा प्रकल्प कालावधी पूर्ण होण्यापूर्वी यापैकी जे अगोदर असेल ते,

• ३०% भांडवली मुल्य उर्वरित बांधकाम क्षेत्राच्या ५०% एवढ्या बांधकाम क्षेत्रासाठी बांधकाम सुरु करण्याच्या दाखल्यास ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यापूर्वी,

• ३०% भांडवली मुल्य उर्वरित बांधकाम क्षेत्रास संपूर्ण बांधकाम सुरु करण्याच्या दाखल्यास ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यापूर्वी किंवा प्रकल्प कालावधी पूर्ण होण्यापूर्वी यापैकी जे अगोदर असेल ते,

• २०% भांडवली मुल्य विक्रीयोग्य इमारतीच्या भोगवटा प्रमाणपत्रास ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यापूर्वी किंवा प्रकल्प कालावधी पूर्ण होण्यापूर्वी यापैकी जे अगोदर असेल ते

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रिमियमपोटी शिल्लक असलेली रु.३९३.२३ कोटी रक्कम वसुल करण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत/आली आहे :-

• पुनर्विकास प्रकल्पांचा प्रकल्प कालावधी संपुष्टात आलेल्या प्रकल्पांमधील विकासकांवर कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या असून, कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर यांना बांधकाम स्थगित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

• भोईवाडा गांव, परेल, मुंबई येथील नागरी नुतनीकरण योजनेंतर्गत मे. विघ्नहर्ता बिल्डर्स यांनी पुनर्विकासास केलेल्या विलंबाबाबत तसेच महापालिकेचा देय असलेला महसुल न दिल्यामुळे, सदर कंत्राटदाराची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे.

• मा.उच्च न्यायालयाने सदर प्रकल्पाकरिता पुनर्निविदेची प्रक्रिया करण्यास परवानगी दिली आहे. तथापि निविदा अंतिम करण्यास मनाई केली आहे.

-----------------

## रामदेव बाबा यांच्या फुड पार्कसाठी नागपूर येथे अल्पदरात दिलेल्या जमिनीबाबत

**(४८) * ९८४९७ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मिहानमधील ६०० कोटी रुपयांची जमीन रामदेव बाबा यांना फूड पार्कसाठी अल्पदरात दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक एकर जमिनीचे दर १०० कोटी असताना रामदेव बाबा यांना फूड पार्कसाठी २५ लाख रुपये प्रति एकर या दराने सदर जमीन दिली असल्याची माहिती व कागदपत्रे, माहिती अधिकारावरील सुनावणी दरम्यान उपलब्ध करून देणाऱ्या समीर गोखले आणि अतुल ठाकरे या दोन अधिकाऱ्यांची बदली केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान  निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहिती अधिकार कायद्याचे पालन करत असलेल्या अधिकाऱ्यांना अशाप्रकारे दंडित केल्याप्रकरणी माहिती कार्यकर्त्यांनी विरोध दर्शविला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रामदेव बाबा यांच्या फुड पार्कसाठी अल्पदरात दिलेल्या जमिनीवर सदरील प्रकल्प अजूनही उभा राहिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकल्पाद्वारे विदर्भातील लोकांना रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे बाबा रामदेव यांना दिलेली सदरहू जमिन ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर येथील मिहान सेझ प्रकल्पाच्या बाहेरील क्षेत्रात सुमारे २३० एकर जमीन शेतमाल आधारीत फुड पार्ककरीता देण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळाच्या निर्देशानुसार ३ सचिव स्तरीय संचालकांची एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या अहवालानुसार फूड पार्कच्या विक्रीसाठी रु. २५.०० लक्ष प्रती एकर किमान दर निश्चित करण्यात आला होता. या दराने पतंजली फूड पार्कसाठी जमीन वितरीत करण्यात आली आहे.
(२) व (३) पतंजली फूड पार्कसाठी निविदा प्रक्रिया राबवून वितरीत करण्यात आलेल्या जागेसंबंधी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त झालेल्या अर्जाची हाताळणी जनमाहिती अधिकारी/अपीलीय अधिकारी या नात्याने श्री.समीर गोखले व श्री.अतुल ठाकरे यांनी केलेली नाही. त्यामुळे, त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न नव्हता.

तसेच, श्री.समीर गोखले व श्री. अतुल ठाकरे यांच्या बदल्या या प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे, माहिती अधिकाराखालील सुनावणी व सदर अधिकाऱ्यांची बदली यांचा अन्योन्य संबंध नाही.
(४) व (५) मिहान मध्ये पतंजली फूड पार्कचे बांधकाम प्रगतीपथावर असून दिलेल्या वेळेत बांधकाम व उत्पादन सुरु केल्यास या प्रकल्पाद्वारे येत्या दोन वर्षांत विदर्भात रोजगार उपलब्ध होऊ शकेल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत

**(४९) * १००९७७ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बांधकाम कामगारांसाठी कामगार कल्याण मंडळ कार्यरत असून बांधकाम कर्मचाऱ्यांना या महामंडळाकडून आवश्यक त्या सर्व सेवा सुविधा उपलब्ध होत नसल्याचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बांधकाम कामगारांना ६० वर्षे पुर्ण झाल्यानंतरही या सुविधा मिळण्याबाबत व बांधकाम कामगारांचे कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याबाबतची घोषणा मा.महसूल मंत्री यांनी कोल्हापूर येथे बांधकाम कामगारांच्या परीषदेमध्ये माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बांधकाम कामगारांना आरोग्य विषयक व अन्य सोई सुविधा मिळण्यासाठी बांधकाम कामगारांचे कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यात येईल असे मा. कामगार मंत्री यांनी सांगितले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास कामगारांचे कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत १ सचिव, २ अधिकारी आणि १९८ कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) आणि (४) हे खरे नाही. तथापि दिनांक २८ मे, २०१५ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची पुनर्रचना करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भांडुप (प.) मुंबई येथील मे.एचडीआयएल या विकासकाकडे मुंबई महानगरपालिकेचा मालमत्ता कर थकित असल्याबाबत

**(५०) * ९९६६२ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप (प.) येथील मे.एचडीआयएल या विकासकाकडून रुपये १५५, ९६, ३८, ९१६ एवढा मालमत्ता कर वसूल करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने 'एस' विभागातील उक्त विकासकाच्या १४ मालमत्तांची जलजोडणी खंडीत करण्याची तसेच 'एल' व 'एस' विभागांतील एचडीआयएलच्या प्रत्येकी सहा मालमत्तांची जलजोडणी खंडीत करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, एचडीआयएल या विकासकाच्या 'एस' विभागातील उपरोक्त सहा मालमत्तांच्या कामांना दिलेली परवानगी तात्काळ रद्द करुन मुंबई महानगरपालिकेचा थकीत मालमत्ता कर वसूल होईपर्यंत त्यांच्या नवीन विकास कामांना परवानगी देण्यात येऊ नये अशी मागणी पत्राव्दारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ व आयुक्त, एस विभाग, भांडुप (प) यांच्याकडे दिनांक १४ ऑगस्ट,२०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एचडीआयएल विकासकाकडून मालमत्ता कर वसूलीच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) भांडुप येथील "एस" विभागातील मे. एच.डी.आय.एल. यांच्या १९ मालमत्तांच्या दिनांक ३१.०३.२०१८ पर्यंत थकीत असलेल्या मालमत्ता कराची थकबाकी रु.४३,००,३६,०७८/- इतकी असून, त्यापैकी १३ मालमत्तांच्या जलजोडण्या बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत यापूर्वीच खंडीत करण्यात आल्या आहेत.

उर्वरित ६ मालमत्तांचा अंदाजे थकीत मालमत्ता कर रु.२२,७४,३८,५६४/- इतका असून, सदर मालमत्तांना जलजोडण्या दिलेल्या नसल्यामुळे त्या खंडीत करण्यात आल्या नाहीत.

तथापि, सदर मालमत्तांच्या रु.४,९९,०६७/- इतक्या थकीत जलदेयकामुळे त्यांना तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेल्या जलजोडण्या दिनांक २२.११.२०१७ रोजी खंडीत करण्यात आल्या आहेत.

कुर्ला येथील “एल” विभागातील ६ मालमत्तांचा थकीत मालमत्ता कर रु.१,७९,७९,२९३/- इतका असून, एक मोकळा भूखंड आहे. सदर मोकळ्या भूखंडास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत जलजोडणी देण्यात आलेली नाही.

उर्वरित ५ मालमत्तांना मेसर्स एच.डी.आय.एल. यांच्या नावे जलजोडण्या देण्यात आलेल्या नसून, त्या मानवतावादी दृष्टीकोनातून तेथील रहिवाशांच्या नावे देण्यात आलेल्या आहेत.

सदर ५ मालमत्तांपैकी ४ मालमत्तांची जलदेयके थकीत नसून, एका मालमत्तेच्या रु.१०.९९ लाख इतक्या थकीत जलदेयकाअभावी त्यांची जलजोडणी दिनांक ०४.१२.२०१७ रोजी खंडीत करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एच/पूर्व, एच/पश्चिम, पी/उत्तर, आर/मध्य, एल, एन, एस व टी विभागामध्ये एचडीआयएल विकासकामार्फत विकसित करण्यात येत असलेल्या मालमत्तांच्या मालमत्ता कराची दिनांक ३१.०३.२०१८ पर्यंतची थकबाकी रु. १७५.९० कोटी इतकी असून, सदर मालमत्ता कराच्या वसुलीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

- एच/पूर्व विभागातील सर्व १७ मालमत्तांना जप्ती व अटकावणीची नोटीस बजावण्यात आली आहे.
- एच/पश्चिम विभागातील १ मालमत्ता व टी विभागातील १३ मालमत्तांना जप्ती व अटकावणीची नोटीस बजावण्यात आली आहे.
- पी/उत्तर विभागातील १३ पैकी १२ मालमत्तांना थकबाकी भरण्यासाठी २१ दिवसांची व ४८ तासांची नोटीस बजावण्यात आली आहे व एका मालमत्तेवर जप्ती व अटकावणीची नोटीस बजावण्यात आली आहे.
- आर/मध्य विभागातील एका मालमत्तेवर मागणीपत्र पाठविण्यात येऊन पुन्हा मोहोरबंद करण्यात येत आहे.
- एल विभागातील १ मालमत्ता मोहोरबंद करण्यात आली असून, ३१ मालमत्ताधारकांना २१ दिवसांच्या कालावधीत थकबाकी भरण्याबाबत मागणीपत्र बजावण्यात आले आहे.
- एन विभागातील २ मालमत्तांना मागणीपत्र बजावण्यात आले असून, १ मालमत्तेवर जप्ती अटकावणीची कार्यवाही प्रस्तावित आहे.

• एस विभागातील २० मालमत्तांपैकी १४ मालमत्तांची जलजोडणी खंडीत करण्यात आली असून, ६ मालमत्तांची जलजोडणी खंडीत करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

-----------------

## सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई येथे बेकायदेशीररीत्या डान्सबार सुरू असल्याबाबत

**(५१) * ९९९७७ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई येथील गजधर बांधरोड, शांतारामबुवा पाटील मार्ग येथील लक्षदीप व लवली नाईट या दोन बारमध्ये बेकायदेशीररीत्या व पहाटे चार वाजेपर्यंत अल्पवयीन मुलींचा अश्लील डान्स सुरू असल्याप्रकरणी स्थानिक रहिवाश्यांनी मागील ३ वर्षापासून सातत्याने मा.मुख्यमंत्री, पोलीस आयुक्त, बृन्हमुंबई पोलीस, उपआयुक्त परिमंडळ-९, सहआयुक्त गुन्हे अन्वेषण विभाग आदींकडे तक्रारी करूनही लक्षदीप आणि लवली नाईट या डान्सबार विरोधात कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई पोलीस आयुक्त यांच्याकडे लेखी तक्रार व निवेदन सादर केले असताना कारवाई करण्याऐवजी परिमंडळ-९ च्या उप आयुक्ताशी संपर्क साधण्याबाबत रहिवाशांना सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिमंडळ-९ चे उपआयुक्त, सांताक्रुझ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक तसेच समाजसेवक शाखेच्या अधिकाऱ्यांना सदरहू दोन्ही डान्सबार मालकांकडून दरमहा ४० लाख रूपयांहून अधिक हप्ता देण्यात येत असल्यामुळे कारवाई होत नसल्याची तक्रार स्थानिक नागरीकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पोलीसांकडून मिळणाऱ्या गैरवाजवी प्रोत्साहनामुळे बारमालकांकडून स्थानिक नागरीकांना धमक्या देण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

लक्षदीप व लव्हली रेस्टॉरंट आणि बार या आस्थापनांवर उपायुक्त, परिमंडळ-९ तसेच पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांजकडून वेळोवेळी शिक्षा देण्याची कारवाई करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर आस्थापनांवर परिमंडळ-९ व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांजकडून कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

अशा प्रकारची कोणतीही तक्रार पोलीस ठाणे व परिमंडळ-९ कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(४) हे खरे नाही.

बारमालकांकडून स्थानिक नागरिकांना धमक्या देण्यात येत असल्याबाबत तक्रार पोलीस ठाण्यास प्राप्त झालेली नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हनुमाननगर, कांदिवली (पूर्व) मुंबई येथे युनिक किमया रिएल्टीतर्फे सुरु असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत

**(५२) * ९६६१७ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (पूर्व) हनुमाननगर येथे युनिक किमया रिएल्टीतर्फे सुरु असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील खुल्या विक्रीच्या इमारतींचा ताबा सदनिकाधारकांना माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान देण्यात येणार होता परंतू त्यानंतर माहे सप्टेंबर, २०१५ ही तारीख निश्चित करण्यात आली व विकासक ताबा देण्यास टाळाटाळ करीत असताना दिनांक १० ऑगस्ट,

२०१७ रोजी वा त्या सुमारास विकासकामार्फत मेलद्वारे सदनिकाधारकांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्याची माहिती देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोगवटा प्रमाणपत्र मिळालेल्या या इमारतींची प्रत्यक्ष पाहणी केली असता भिंतीच्या अंतर्गत प्लॅस्टरिंगचे काम न होणे, लाद्या बसविलेल्या नसणे, लिफ्टचे काम अपूर्ण असणे, सांडपाण्याची यंत्रणा नसणे, इत्यादी कामे अपूर्ण असल्याचे व पोडीअमवर पूर्वीच्या आराखड्यात उल्लेख नसलेल्या तीन बीएचके सदनिका बांधण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेरा नियमक प्राधिकरणांतर्गत येऊ नये याकरिता दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी व तद्पूर्वी अनेक विकासकांनी प्रगतीपथावर असलेल्या अनेक प्रकल्पांसाठी भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) घेतले परंतु ही प्रमाणपत्रे अर्धवट बांधकामांना देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रेरा प्राधिकरणांतर्गत नोंदणी करावी लागू नये याकरिता विकासकांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासोबत मुंबई महानगरपालिकेनेही दिनांक १ मे ते ३१ जुलै, २०१७ या कालावधीत बहुसंख्य भोगवटा प्रमाणपत्रे दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) विक्री घटकातील सदनिकांबाबत विकासकाने केलेल्या व्यवहाराची माहिती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे असणे अपेक्षित नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिकेचा अहवाल आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# मुंबईतील एल्फिस्टन (प्रभादेवी) व परळ रेल्वे स्थानकाला जोडणाऱ्या अरुंद पादचारी पुलावर झालेल्या दुर्घटनेत २३ जणांचा झालेला मृत्यू

**(५३) * ९५००८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एल्फिस्टन (प्रभादेवी) व परळ रेल्वे स्थानकाला जोडणाऱ्या अरुंद पादचारी पुलावरील प्रचंड चेंगराचेंगरीत २३ जणांचा मृत्यू होऊन ३६ प्रवासी जखमी झाले असल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेतील मृतांचे शवविच्छेदन के.ई.एम. रूग्णालयात झाले त्यावेळेस रूग्णालयातील डॉक्टरांनी अतिरेकी किंवा गँगस्टर चकमकीत मारले गेल्यानंतर त्यांच्या डोक्यावर नमूद करतात त्याप्रमाणे उक्त घटनेतील मृतांच्या डोक्यावर मार्करने १ ते २३ आकडे टाकल्यामुळे या प्रकरणाची

चौकशी करण्याची मागणी संतप्त लोकप्रतिनिधी व जनतेकडून केली असल्याची बाब दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मृत्यमुखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना तातडीने राज्य शासनाच्या सेवेत अथवा भारतीय रेल्वेच्या सेवेत सामावून घेण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) त्याचप्रमाणे ठाणे, कुर्ला, घाटकोपर, डोंबिवली, कल्याण, वांद्रे, बोरिवली, विरार इत्यादी रेल्वे स्थानकांवरील पुलावर उपरोक्त चेंगराचेंगरीच्या घटना घडण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, एल्फिस्टन स्थानकात घडलेल्या दुर्घटनेची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर घटनेस जबाबदार असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना व जखमींना कोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच एल्फिन्स्टन स्थानकात घडलेल्या या दुर्घटनेनंतर मुंबईतील सर्व रेल्वेस्थानकांतील गर्दीचे व्यवस्थापन करुन भविष्यात आशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी एल्फिन्स्टन-परेल स्थानकांसह सर्वच उपनगरीय रेल्वे स्थानकांचा आढावा घेवून नविन पादचारी पुल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजी वाजता मुंबईतील एल्फिस्टन (प्रभादेवी) व परळ रेल्वे स्थानकाला जोडणाऱ्या अरुंद पादचारी पुलावर चेंगराचेंगरी होऊन २२ जणांचा मृत्यु होऊन, ४७ प्रवासी जखमी झाले होते ही वस्तुस्थिती आहे.

सदर दुर्घटनेतील ४७ जखमी रुग्णांना के.ई.एम. रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असता, एका रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यु झाला व उर्वरित ४६ जखमी रुग्णांना उपचाराअंती सोडून देण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे. दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजी सकाळी सुमारे १०.३० नंतर के.ई.एम. रुग्णालयाच्या अपघात विभागात एकूण २२ मृतदेह एकापाठोपाठ आले होते. त्यामुळे मृतदेहांची ओळख पटविण्याकरिता मृतदेहाच्या डोक्यावर मार्करने खुणा करण्यात आल्या होत्या.

सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी सुरु आहे.

(३) सदर दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या २३ व्यक्तींच्या कायदेशीर वारसांकरिता मानवतावादी दृष्टीकोनातून रु. ५ लक्ष याप्रमाणे एकूण रु. १.१५ कोटी इतके अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मंजूर करण्यात आले असून, संबंधितांना कायदेशीररीत्या सुपूर्द करण्याकरिता जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना उपलब्ध करुन देण्यात आले आहे. जखमींवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मोफत उपचार करण्यात आले आहेत.

सदर दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना राज्य शासनाच्या सेवेत अथवा भारतीय रेल्वेच्या सेवेत सामावून घेण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ०४.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे हे खरे आहे.

(४) व (५) पश्चिम रेल्वेकडून प्राप्त अहवालानुसार, सदर दुर्घटनेची पश्चिम रेल्वेमार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यात आली असून यामध्ये कोणीही अधिकारी दोषी आढळून आलेले नाही.

शासनामार्फत प्रश्न भाग-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आर्थिक मदत देण्यात आली आहे.

(६) रेल्वे स्थानकांवर पुन्हा चेंगराचेंगरीच्या  घटना घडू नये याकरिता मध्य रेल्वे व पश्चिम रेल्वे यांच्याकडून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असल्याचे / येत असल्याचे त्यांच्याकडून कळविण्यात आले आहे:-

• वांद्रे, बोरीवली आणि विरार स्टेशनवर चेंगराचेंगरीच्या घटना घडू नयेत याकरिता नवीन पादचारी पुल बांधण्यात आले आहेत.

• पश्चिम रेल्वेच्या स्थानकांवर १ नवीन स्कायवॉक, १० नवीन पादचारी पुल आणि जुन्या २१ पुलांच्या जागी नवीन पुल बांधण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

• मध्य रेल्वेच्या ५२ स्टेशनांच्या पुलावर पादचाऱ्यांच्या नियंत्रणासाठी महाराष्ट्र पोलीसांच्या सहकार्याने अतिरिक्त सुरक्षा दलाची व्यवस्था करण्यात आली आहे.

• स्टेशन परिसर व पादचारी पुलावरील अनधिकृत फेरीवाल्यांना हटविण्याची कार्यवाही सुरु आहे.

• स्टेशनबाहेरील गर्दी कमी करण्यासाठी अनधिकृत दुकाने हटविण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या विविध बांधकामाचे बनावट चाचणी प्रमाणपत्र सादर करून देयके मंजूर केल्याबाबत

**(५४) * ९५५२९ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या विविध बांधकामाचे बनावट चाचणी प्रमाणपत्र सादर करून देयके मंजूर केल्याची बाब दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या अख्त्यारीतील सुमारे ५० कार्मिकी अभियंत्यांवर त्यांनी केलेल्या नियमबाह्य वा सदोष कामाबद्दल तसेच अशा विविध बांधकामाचे दक्षता तसेच गुणनियंत्रण प्राधिकाऱ्याच्या अनागोंदी कारभारामुळे बनावट चाचणी प्रमाणपत्र सादर करणाऱ्या अभियंत्यांवर देयके मंजूर केल्याची बाब दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी बनावट चाचणी प्रमाणपत्र सादर करणारे ३७ कंत्राटदार आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) (२), (३), व (४) अशंत: खरे आहे.

भारताचे नियंत्रक तथा लेखा परिक्षक यांनी सन २०१२-१३ या वर्षाच्या लेखा परिक्षण अहवालात कामाच्या गुणवत्तेबाबत सादर केलेल्या प्रमाणपत्रावर आक्षेप नोंदविले आहेत. सदर अहवालात, या कामामध्ये सुमारे ४० बनावट चाचणी प्रमाणपत्र असल्याचे नमूद करण्यात आले आहे. म्हाडाकडुन प्राप्त अहवालानूसार या प्रकरणी २० कंत्राटदार व १७ मजूर सहकारी संस्था यांना काळया यादीत टाकण्याची कार्यवाही म्हाडाकडून करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे या प्रकरणी संबंधित ४६ अधिकारी / कर्मचाऱ्यांना चौकशी करण्याच्या दृष्टीने नोटीसा बजावण्यात आल्या असून चौकशी अंती पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

महालेखापालाच्या आक्षेपांच्या अनुषंगाने लोकलेखा समिती समोर गृहनिर्माण विभागाची साक्ष झाली असून लोकलेखा समितीने केलेल्या शिफारसी विचारात घेऊन या प्रकरणी सदर चौकशी त्रयस्थ यंत्रणेमार्फत करण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण विभागाने शासनास प्रस्ताव सादर केला आहे.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## सिन्नर (जि.नाशिक) नगरपरिषदेचे भारत पेयजल योजनेच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष झाल्याने लाखो रुपयांचा निधी शासनास परत गेल्याबाबत

**(५५) * ९५३९९ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर नगरपरिषदेत (जि.नाशिक) भारत पेयजल योजनेच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष झाल्याने ५६ लाख रुपयांचा निधी शासनास परत गेल्याची बाब दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारत पेयजल योजनेच्या अंदाजपत्रकात दर्शविण्यात आलेल्या अनेक ठिकाणच्या पाईपलाईन अस्तित्वातच नसल्याने योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अधिकारी व ठेकेदारांनी संगनमत करून या योजनेत लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि,

- UIDSSMT योजनेंतर्गत सिन्नर नगरपरिषदेच्या रु. ६६.३२ कोटी इतक्या रकमेच्या पाणी पुरवठा योजनेस केंद्र शासनाने दिनांक ०९.१२.२०१३ रोजी मंजूरी दिली आहे.
- सदर योजनेकरीता केंद्र शासनाने रु. ३९.८३ कोटी, राज्य शासनाने रु. १३.२६ कोटी इतके अनुदान मंजूर केले आहे. नगरपरिषदेने स्वहिश्यातून रु. १६.४८ इतका निधी उभारला आहे. त्यातील रु. ५३ कोटी इतका निधी खर्च झालेला असून, सदर योजना माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत पुर्ण करण्याबाबत शासनाकडून सूचना देण्यात आल्या आहेत.
- पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या “महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान” योजनेंतर्गत उपलब्ध करण्यात आलेले रु. ११.५३ कोटी इतके शासन अनुदान पुर्णत: खर्च झालेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धर्मादाय रुग्णालयात गरीब गरजू रुग्णांना उपचार मिळत नसल्याबाबत

**(५६) * ९५०२५ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमर काळे**

**(आर्वी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विलेपार्ले (मुंबई) येथील नानावटी धर्मादाय रुग्णालयात धर्मादाय आयुक्तांनी 'स्टिंग ऑपरेशन' करुन केलेल्या पाहणीत गरीब रुग्णांना उपचार नाकारले जात असल्याची बाब दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आणून रुग्णालयाच्या विश्वस्तांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे जिल्हयातील धर्मादाय रुग्णालये दारिद्र्य रेषेखालील रुग्णांवर उपचार करीत नसल्याचे निदर्शनास आल्यासंदर्भात दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये धर्मादाय समितीच्या झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सबंधितांना कडक कारवाई करण्याचे आदेश दिलेले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या धर्मादाय रुग्णालयांनी त्यांच्याकडील एकूण मंजूर खाटांच्या १० टक्के खाटा गरीब रुग्णांकरीता राखीव ठेवणे बंधनकारक असतांना व राज्यातील बहुतांश धर्मादाय रुग्णालये गरीब रुग्णांवरील उपचाराच्या नावाखाली शासनाकडून मिळणाऱ्या सवलती घेऊनही गरीब रुग्णांना उपचार देत नसल्याचे उपरोक्त घटनेमुळे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धर्मादाय रुग्णालयांना शासन अनुदान, मोफत जमीन, वैद्यकीय उपकरणे, यंत्रसामुग्री यांना सीमा शुल्कातून सूट तसेच जकात करामधुन सुट, विविध करांमध्ये सवलत इत्यादी सवलती व सुविधा शासनाकडून दिल्या जातात, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील अनेक धर्मादाय रुग्णालये नियमांचे उल्लंघन करीत असल्याचे निदर्शनास आल्याने राज्यातील विशेषत: मुंबईतील किती धर्मादाय रुग्णालयांची तपासणी करण्यात आली आहे,

(६) असल्यास, सदरहू तपासणीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी रुग्णालयांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय, ठाणे जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालयांच्या खाटा राखून ठेवण्याच्या जिल्हास्तरीय समितीच्या दि. २१/०८/२०१७ रोजी झालेल्या सभेत, धर्मादाय रुग्णालयांना अचानक भेटी देवुन तपासणी करण्यासाठी सहायक धर्मादाय आयुक्त व जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे प्रतिनिधी तसेच संबंधित तहसिलदार यांचे पथक गठित करणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(३) होय, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०चे कलम ४१ क क अंतर्गत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका (PIL) क्र.३१३२/२००४ मध्ये आदेशित केलेल्या योजनेनुसार सार्वजनिक न्यास संचालित धर्मादाय रुग्णालयांनी त्यांचेकडील वापरातील खाटांच्या १० टक्के खाटा ह्या निर्धन रुग्णांना मोफत उपचारासाठी व १० टक्के खाटा ह्या दुर्बल घटकातील रुग्णांकरीता सवलतीच्या दराने उपचारासाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. सदर योजनेची देखरेख धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून करण्यात येते.

त्यानुसार, धर्मादाय रुग्णालये सर्वसाधारणपणे उपरोक्त योजनेची अंमलबजावणी करतात असे धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे निरीक्षण आहे. तथापि, काही रुग्णालये मात्र योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करीत नसल्याचे प्रसंगवशात निदर्शनास येते.

(४) होय, महाराष्ट्र सार्वजनिक विश्‍वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५८(२) नुसार राज्य शासनास, ज्या सार्वजनिक विश्‍वस्त व्यवस्था पुर्णता वैद्यकीय सहाय्य या प्रयोजनार्थ असतील अशा विश्‍वस्त व्यवस्थांना अंशदान देण्यातुन सुट देता येईल, अशी तरतूद आहे.

त्यानुसार, जे सार्वजनिक न्यास पुर्णत: वैद्यकीय उपरोक्त धर्मादाय रुग्णालयांना सार्वजनिक न्यास प्रशासन निधित अंशदान भरणा करण्यापासून सुट देण्यात आली आहे.

तथापि, सदर धर्मादाय रुग्णालयांना इतर शासकीय विभाग/ प्राधिकरणांकडून जमीन करांमधील सवलती इत्यादी बाबत देण्यात आलेल्या सवलतींची अधिकृत माहिती या विभागाकडे उपलब्ध नाही.

(५) धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र यांच्या अहवालानुसार धर्मादाय रुग्णालये सर्वसाधारणपणे योजनेचे पालन करीत आहेत. तथापि, धर्मादाय संघटनेअंतर्गत सर्व जिल्हा कार्यालयांना धर्मादाय रुग्णालयांचे नियमीतपणे निरीक्षण करण्यासाठी मानके ठरवून देण्यात आलेली आहेत. त्यानुसार निरीक्षणाच्या वेळी धर्मादाय रुग्णालयांनी योजनेच्या अंमलबजावणीत कसूर केल्याचे आढळल्यास आवश्यक ती कार्यवाही / कारवाई करण्यात येते.

मुंबईत आजमितीस एकूण ७४ धर्मादाय रुग्णालये असून त्यांची रुग्णालय निरीक्षकांमार्फत तसेच इतर समित्यांकडून वेळोवेळी तपासणी केली जाते.

(६) धर्मादाय रुग्णालयांच्या तपासणीत साधारणपणे

१. योजनेचा फलक दर्शनी भागात न लावणे.

२. राखीव खाटांचा फलक न लावणे.

३. राखीव खाटांवर इतर रुग्णांना दाखल करुन घेणे.

४. योजनेअंतर्गत लाभार्थी रुग्णांची देयके तरतूदींनुसार न करणे.

५. देयकात ना देयक सेवांचा आकार आकारणे.

६. देयक सेवांचा आकार निम्नस्तराने न आकारणे.

७. औषधे/इंम्प्ल्टांस/कंन्झ्युमेबल्स इत्यादींचा आकार रुग्णालयाच्या खरेदी किंमतीत न आकारणे वगैरे अशा प्रकारचे आक्षेप आढळून येतात.

आढळून आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही/कारवाई करण्यात येते.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील भुयारी गटार योजनेबाबत

**(५७) * ९८६३६ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिका (जि.ठाणे) क्षेत्रातील भुयारी गटारांच्या योजनेकरिता केंद्र व राज्य शासनाकडून रूपये २२३ कोटी इतका निधी मंजुर करण्यात आला असून सदरचे काम तीन टप्यात पूर्ण करण्यास मान्यता मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी पहिल्या टप्यात रूपये ३३ कोटींचा निधी उल्हासनगर महानगरपालिकेला देवून काम सुरू करण्याचे आदेश दिलेले असतानाही महानगरपालिकेच्या विलंबामुळे शासनाने दिलेला सदर निधी परत करण्याचे आदेश उल्हासनगर महानगरपालिकेस दिले असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामाकरिता निविदा प्रक्रियेतील खिलारी कंपनीकडून करण्यात येणारे खेमानी नाल्याचा प्रवाह बदलण्याचे काम गत सहा महिन्यांपासून अपूर्ण असल्याने उपरोक्त भुयारी गटाराचे काम खिलारी कंपनीला देण्यात येऊ नये अशी मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू भुयारी गटार योजनांची निविदा प्रक्रिया पूर्ण करून काम तातडीने सुरु करण्याबाबत तसेच सदरहू योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत शासनाने चौकशी व कार्यवाही केली आहे काय, त्याचा तपशील काय आहे,

(५) असल्यास, या प्रकरणी विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत उल्हासनगर शहराच्या मलनिस्सारण योजनेसाठी रु.८५.२४ कोटीच्या कामास माहे डिसेंबर, २०१६ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) • सदर प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासनाच्या हिश्याचा पहिल्या हप्ता म्हणून रु.३३.२५ कोटी निधी महानगरपालिकेस वितरीत करण्यात आला आहे.

• सदर निधी परत करण्याबाबत कोणतेही आदेश शासनाकडून देण्यात आलेले नाहीत.

(३) • उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्वनिधीतून खेमाणी नाल्याचा प्रवाह बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

• सदर कामाचे कार्यादेश उल्हासनगर महानगरपालिकेने मे.खिल्लारी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी यांना फेब्रुवारी २०१६ मध्ये दिलेले आहेत.

• सदर प्रकल्पाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही.

• संबंधित ठेकेदाराने यापूर्वी दिलेल्या कामाची मुदत संपूनही कामे पूर्ण न केल्यामुळे अमृत अभियानांतर्गत मंजूर मलनिस्सारण प्रकल्पाची निविदा प्रक्रिया रद्द करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली होती, हे खरे आहे.

(४), (५) व (६) • अमृत अभियानांतर्गत मंजूर प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता क व ड वर्ग महानगरपालिकांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे.

• त्यानुसार अमृत अभियांनातर्गत मंजूर उल्हासनगर शहर मलनिस्सारण प्रकल्पांची निविदा प्रक्रिया ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मार्गदर्शनाखाली उल्हासनगर महानगरपालिकेने राबविलेली आहे.

• महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सल्ल्यानुसार लघुत्तम निविदाकार मे.खिल्लारी इन्फ्रास्ट्रक्चर यांची निविदा उल्हासनगर महानगरपालिकेने स्वीकृत केली आहे.

• त्यानुसार सदर कामाचे कार्यादेश तातडीने देऊन प्रकल्पाचे काम विहीत कालमर्यादेमध्ये पूर्ण करणेबाबतच्या सूचना उल्हासनगर महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

-----------------

## कार्ला (लोणावळा, जि.पुणे) येथील एकविरा देवीच्या मंदिरावरील सोन्याचा मुलामा असलेल्या कळसाची झालेली चोरी

**(५८) * ९५१८३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्ला (लोणावळा, जि.पुणे) येथील एकविरा देवीच्या मंदिरावरील सोन्याचा मुलामा असलेल्या पंचधातूच्या कळसाची दिनांक २ ऑक्टोब, २०१७ रोजी वा त्यासुमारास चोरी झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, भविष्यात असे अनुचित प्रकार घडू नयेत याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १४३/२०१७ भा.दं.वि. कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

(३) लोणावळ्यातील कार्ला येथील एकविरा देवीच्या मंदिरात व त्या परिसरात पुन्हा असा अनुचित प्रकार घडू नये याकरीता विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, अपर पोलीसअधीक्षक, पुणे विभाग, उपविभागीय पोलीस अधिकारी, लोणावळा उपविभाग, प्रभारी अधिकारी, लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन व पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, पुणे ग्रामीण यांनी एकविरा मंदिराचे ट्रस्टी यांची मिटींग घेवून या पुढे अशा घटना घडून कायदा व सुव्यवस्थेबाबत प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत खबरदारी घेण्याच्या अनुषंगाने सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच मंदिर परीसरात नियमितपणे पेट्रोलींग करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) शहरातील नागरिकांसाठी उपलब्ध होणारे पाणी अवैधरित्या स्थानिक कारखान्यांना पुरविले जात असल्याबाबत

**(५९) * ९५२०३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरातील (जि.ठाणे) नागरिकांना पिण्याचे पाणी हे स्टेपम प्राइज़ व मुंबई महानगरपालिका यांच्याकडून विकत घेऊन पुरविले जात असताना नागरिकांसाठी उपलब्ध होणारे पाणी महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने डाईंग, सायजिंग व यंत्रमाग कारखान्यांना चोरुन पुरविले जात असल्याची बाब दिनांक १४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी दोषी असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने दिनांक ०४.१०.२०१७ ते दिनांक ०७.१०.२०१७ दरम्यान हाती घेतलेल्या शोध मोहिमेमध्ये पाणी पुरवठा करणाऱ्या जल वाहिनीवरून ५ डाईंग व १ रंग कंपनीने अनधिकृत नळ जोडणी घेतल्याचे निदर्शनास आले.

या प्रकरणी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने अनधिकृत नळ जोडणी खंडीत केली असून दिनांक २५.१०.२०१७ रोजी भारतीय दंडविधान संहितेच्या कलम ४२७, ३७९, ४३२ व ३४ अन्वये सबंधितांवर गुन्हा दाखल केला आहे. तसेच अनधिकृतपणे नळ जोडणी करणाऱ्यांविरुध्द दंड आकारणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उच्चशिक्षित डॉक्टर व वकील यांनी राज्य परिवहन महामंडळाची बनावट कागदपत्रांच्या आधारे केलेली फसवणूक

**(६०) * ९५०३४ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी प्रवाशांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेऊन उच्चशिक्षित डॉक्टर व वकिलांनी राज्य परिवहन बस अपघातातील जखमींना नुकसान भरपाई देण्याचे अमिष दाखवून बनावट कागदपत्राद्वारे राज्य परिवहन महामंडळाची रू. १,२४,७५,००० इतक्या रकमेची फसवणूक केल्या प्रकरणी ठाणे शहर पोलीस ठाण्यात दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन बसला माहे मार्च, २०१६ मध्ये झालेल्या अपघातासाठी १,१६,७५ ००० रुपये तसेच माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये झालेल्या अपघातासाठी ८ लाख रुपये इतक्या रक्कमेकच्या नुकसान भरपाईची मागणी, बनावट डिस्चार्ज कार्ड आणि अपंगत्व प्रमाणपत्रांच्या आधारे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी राज्य परिवहनचे सुरक्षा व दक्षता अधिकारी यांनी याबाबत चौकशी करुन ठाणे शहर पोलीस ठाण्यात वकील यू.आर.विश्वकर्मा व डॉ.मिहिर अविनाश रनावरे यांच्या विरोधात तक्रार दाखल केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर वकिल व डॉक्टरवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) होय, सदर प्रकरणी ठाणेनगर पोलीस स्टेशन, ठाणे येथे गु.र. क्र.१९३/२०१७, भा.दं.वि. कलम ४१७, ४६५, ४६८, ४७१, ३४ अन्वये ३ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. नमुद गुन्ह्यात २ आरोपींना अटक करण्यात आली असुन आरोपी डॉ.मिहीर रणनवरे यांच्या सहभागाबद्दल चोकशी सुरु आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी (पूर्व) येथील हबटाऊन सोलारिस या व्यावसायिक इमारतीमधील क्षेत्रफळाचे उल्लंघन करुन झालेला गैरव्यवहार

**(६१) * ९८६५५ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधेरी (पूर्व) येथील हबटाऊन सोलारिस या व्यावसायिक इमारतीत एलव्हेशन प्रोजेक्शन (elevation projection A.H.U.), सर्विस एरिया, रेफ्यूज एरिया (service area, refuge area) इत्यादी वापराकरिता चटईक्षेत्र निर्देशांकामध्ये (F.S.I.) सूट असलेल्या क्षेत्रफळ प्रत्यक्ष चटई क्षेत्रात अनधिकृतरित्या समाविष्ट केल्यामुळे १ लाख चौरस फुट क्षेत्रफळाच्या मर्यादेचे उल्लंघन होऊन गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पू. विभागाने सदर इमारतीची पाहणी केली असून या प्रकरणी मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम करून क्षेत्रफळ मर्यादेचे उल्लंघन केले असल्याचे कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांस पत्र पाठवून त्वरित कारवाई करण्याची मागणी केली असतांनाही त्या मागणीकडे आजपर्यंत त्यांनी दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १ ते ९ मजल्यांवरील बांधकामात क्षेत्रफळ मर्यादेचे उल्लंघन झाले असल्याचे निदर्शनास आल्यानंतर व तक्रार प्राप्त झाल्यानंतरही १०, ११ व १२ या मजल्यांचे वाढीव बांधकाम करण्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी परवानगी दिली, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करून क्षेत्रफळ मर्यादेचे उल्लंघन केल्याबाबत संबंधित विकासकावर व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

सदर प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.१७.११.२०१७ च्या पत्रान्वये विकासकावर MRTP अधिनियमातील कलम ५३(१) अंतर्गत नोटीस बजावण्यात आली असून पुढील कार्यवाही चालू आहे.

या योजनेमध्ये व्यावसायिक इमारतीला दि.२१.०१.२०१६ रोजी पुढील बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दि.०८.०९.२०१६ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रफळाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यानंतर विक्री घटकाच्या बांधकामास कोणत्याही परवानग्या देण्यात आलेल्या नाहीत असा प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला (जि.अकोला) तालुक्यातील १४ अवैध सावकारी प्रकरणे फौजदारी कारवाईविना प्रलंबित असल्याबाबत

**(६२) * ९९४५५ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला तालुक्यातील (जि.अकोला) १४ अवैध सावकारी प्रकरणे फौजदारी कारवाईविना माहे ऑक्टोबर, २०१७ पर्यंत प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार १४ अवैध सावकारांवर तसेच सदर प्रकरणे कारवाईविना प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) गोरेगाव खुर्द, ता.अकोला, जि.अकोला येथील १५ शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीनुसार सदर प्रकरणी ४ आरोपींविरूद्ध पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, अकोला येथे अप.क्र. ७०/१२ कलम ४२०, १२० (ब) भादंवि सहकलम ३९, ४२ महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या गुन्हयाव्यतिरीक्त कारंजा, तालुका अंजनगाव, जि. अमरावती येथील तक्रारदारांच्या तक्रारीवरून ३ आरोपींविरूद्ध पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, अकोला येथे अप.क्र. २३६/१७ कलम ३९ महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर दोन्ही गुन्हे तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा (जि.बुलढाणा) नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा योजनेच्या सुधारणा कामास व शहरात दोन अतिरिक्त पाणी टाक्यांच्या बांधकामास मंजूरी मिळण्याबाबत

**(६३) * ९५०९५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा (जि.बुलढाणा) नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा योजनेच्या सुधारणा कामास प्रशासकीय मंजूरी व दोन अतिरिक्त पाणी पिण्याच्या टाक्यांच्या बांधकामास मंजूरी देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्यामार्फत शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार पाणी पुरवठा योजनेच्या सुधारणा कामास व पाणी टाकीच्या बांधकामास प्रशासकीय मंजूरी व आवश्यक निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • बुलढाणा शहरातील पाणीपुरवठा योजनेच्या सुधारणा कामांसाठी रु. १.०६ कोटी निधी उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने बुलढाणा नगरपरिषदेने जिल्हा नियोजन समितीस सादर केलेल्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे निवेदन सन्माननीय सदस्यांनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना दिले आहे हे खरे आहे.
(२) व (३) • महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत बुलढाणा शहरास खडकपूर्णा धरणातून पाणीपुरवठा करण्याच्या रु.८२.७७ कोटी किंमतीच्या योजनेस शासनाने सन २०१२ मध्ये मान्यता दिलेली आहे.
• सदर योजनेमध्ये बुलढाणा शहरातील पाणी वितरण व्यवस्थेबरोबर दोन उंच टाक्यांची कामे प्रस्तावित आहेत. या टाक्यांकरिता आवश्यक असलेला निधी सदर योजनेमध्ये उपलब्ध आहे.
• याव्यतिरिक्त बुलढाणा नगरपरिषदेने शहरातील पाणीपुरवठा योजनेच्या सुधारणा कामाच्या अनुषंगाने निधी मागणी प्रस्ताव जिल्हा नियोजन व विकास समितीकडे नाविन्यपूर्ण योजनेखाली दाखल केला आहे.
• सदर प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीच्या विचाराधीन आहे.

-----------------

## मुंबई महानगरपालिका व म्हाडातर्फे बांधण्यात आलेल्या शौचालयांच्या बांधकाम तसेच दुरुस्ती खर्चामध्ये झालेला गैरव्यवहार

**(६४) * ९५०७४ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका व म्हाडातर्फे बांधण्यात आलेल्या शौचालयांच्या बांधकाम तसेच दुरुस्ती खर्चामध्ये २०० ते २५० कोटी रूपयांचा गैरव्यवहार झाला असून सदर प्रकरणी तातडीने चौकशी करण्यात यावी व दोषी व्यक्तींविरुध्द कारवाई करावी अशी लेखी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांनी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या एस.डब्ल्यू.एस. विभागाकडून माहितीचा अधिकार अंतर्गत मिळालेल्या अहवालावरुन सदर मागणी केली असून सदर पत्रासोबत अहवाल जोडण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दैनिक मुंबई मिरर या वृत्तपत्राच्या दिनांक ०२.०८.२०१७ रोजीच्या वृत्तपत्रातील बातमीनुसार, श्री. अनिल गलगली यांनी माहिती अधिकार अंतर्गत माहिती प्राप्त करुन घेऊन, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने चौकशी करण्याबाबत विनंती केली आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने माहिती अधिकार अर्जांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने चौकशी करण्याचे निदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चेंबूर (मुंबई) येथे मोठ्या प्रमाणावर झाडांची तोड करण्यात आल्याबाबत

**(६५) * ९५८८८ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करिष्मा बिल्डर ॲन्ड डेव्हलपर्स, मुंबई यांनी नियमांचे पालन न करता सरोज स्वीट समोर, चेंबूर रेल्वे स्टेशन, मुंबई येथील झाडे तोडल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन संबंधितावर कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक रहिवाशांनी व लोकप्रतिनिधींनी सहाय्यक आयुक्त एम, पश्चिम विभाग, महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका व पोलीस आयुक्त, मुंबई यांच्याकडे दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच त्याचप्रमाणे विणा विकासक, अंधेरी (पूर्व) मुंबई यांनी शेल कॉलनी, चेंबूर येथील झाडे मोठया प्रमाणात तोडली असून या संदर्भात दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ व ७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास चौकशी करुन संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीनुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) चेंबूर स्टेशनजवळील सरोज स्वीटसमोर करिष्मा विकासक यांनी त्यांच्या बांधकाम जागेवरील ४० फुट उंचीचे झाड कापल्याबाबत व वीणा विकासक यांनी शेल कॉलनी येथील त्यांच्या बांधकाम जागेवरील सर्व झाडे ॲसिड टाकून मारत असल्याबाबत दिनांक ०२.११.२०१६ रोजी लेखी तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) दिनांक ०२.११.२०१६ रोजी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

• शेल कॉलनी, चेंबूर येथील वीणा डेव्हलपर्स यांचेमार्फत इमारत विकासकाम सुरु असलेल्या भूखंडाची दिनांक ०६.११.२०१६ रोजी स्थळपाहणी केली असता, दोन वृक्ष निष्काळजीपणामुळे मृत झाल्याचे आढळून आले.

• सदर प्रकरणी वीणा डेव्हलपर्स यांचेविरोधात दिनांक १३.०२.२०१७ रोजी नेहरु नगर पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम-१९७५ अंतर्गत क्रमांक ३९७/२०१७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

• चेंबूर येथील करिष्मा डेव्हलपर्स यांचेमार्फत विकासकाम सुरु असलेल्या भूखंडाची दिनांक ०७.११.२०१६ रोजी स्थळपाहणी केली असता, विकासकाम सुरु असलेल्या भूखंडाच्या प्रवेशद्वारासमोरचे एक झाड परवानगी न घेता कापल्याचे आढळून आले.

• सदर प्रकरणी करिष्मा डेव्हलपर्स यांचेविरोधात दिनांक २५.०१.२०१७ रोजी चेंबूर पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम-१९७५ अंतर्गत क्रमांक १९७/२०१७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील भरडखोल धाऱ्याचे बंदर ते टेपावाला बंदर व शेखाडी मुस्लीम मोहल्ला बंदरांतील नौकानयन मार्गातील गाळ व खडक काढण्याबाबत

**(६६) * ९५७८१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील भरडखोल धा-याचे बंदर ते टेपावाला बंदर तसेच शेखाडी मुस्लीम मोहल्ला बंदरातील नौकानयन मार्गातील गाळ काढण्याच्या व कातळ (खडक) फोडण्याच्या प्रस्तावित कामांना मंजुरी मिळावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नौकानयन मार्गाचा वापर करणाऱ्या प्रवासी व मासेमारी बोटींना नौकानयन मार्गातील खडक व गाळामुळे बोटींचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, मासेमारी बोटींचे नुकसान होऊ नये तसेच बोटींचा प्रवासी मार्ग सुखरूप होण्यासाठी नौकानयन मार्गातील गाळ व खडक काढण्याची मागणी प्रवाशांनी व मच्छिमारांनी वेळोवेळी केली आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त बंदरांतील नौकानयन मार्गातील गाळ व खडक काढण्याच्या प्रस्तावीत कामांना तातडीने मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) श्रीवर्धन तालुक्यातील भरडखोल बंदर ते टेपावाला या ठिकाणी प्रामुख्याने मासेमारी केली जाते.येथील नौकानयन मार्गात खडक आहे हे खरे आहे. परंतू त्यामुळे बोटीचे नुकसान झाल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) होय.

(४) सदर नौकानयन मार्गातील खडक व गाळ उपसणी करण्याबाबत येणारा खर्च मत्स्यव्यवसाय विभागाकडून प्राप्त झाल्यास निधीचे उपलब्धतेनुसार काम हाती घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातरस्ता (मुंबई) येथील आर्थर रोड कारागृह परिसरातील इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(६७) * ९५०३१ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातरस्ता (मुंबई) येथील आर्थर रोड कारागृह परिसरातील अनेक इमारतींच्या पुनर्विकासाचे काम शासनाने ५०० मीटर अंतराचा निर्बंध लादण्यापूर्वी सुरु केले असून देखील येथील हजारो रहिवाशी मागील अनेक वर्षांपासून संक्रमण शिबिरात आपल्या इमारतींच्या पुनर्विकासाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (३) शासनाने कारागृहाच्या सभोवताली ५०० मीटर च्या अंतरामध्ये यापुढे कोणतीही विकास परवानगी देण्यापूर्वी दिनांक ४.१२.२०१३ रोजीच्या, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४(१) खालील निदेशान्वये गठीत स्थायी सल्लागार समितीची पूर्व संमत्ती अनिवार्य केलेली आहे. त्याचप्रमाणे दिनांक ६ ऑगस्ट २०१५ रोजी स्थायी सल्लागार समितीसाठी मार्गदर्शक तत्वे विहीत केलेली आहेत. त्यानुसार कारागृहाच्या तटभिंतीपासून १५० मीटर अंतराचे आत मंजूर विकास कामांना परवानगी चालू ठेवतानाही स्थायी सल्लागार समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

यासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिका व म्हाडाचा अहवाल विचारात घेता आर्थर रोड कारागृहानजीक परिसरामध्ये शासनाच्या दिनांक ४.१२.२०१३ रोजीच्या निदेशापूर्वीचे महानगरपालिकेकडील दोन व म्हाडाचा एक मिळून एंकदर तीन प्रकल्प दिसून येत आहेत.

महानगरपालिकेच्या प्रकल्पापैकी भूकर क्र.१ (भाग), २ (भाग), ३(भाग) लोअर परेल विभाग (शांती नगर, महापालिका वसाहत) या भूभागावरील रहिवाशी संक्रमण शिबिरात रहात नाहीत.

महानगरपालिकेच्या ना.म.जोशी मार्गावरील भूकर क्र.६०, १/६१, २/६१, १/१बी/६२ लोअर परेल येथील प्रकल्पाचे संदर्भात बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ३३(९) खालील नागरी नूतनीकरण योजनेच्या प्रकल्पामधील काही इमारती पाडणेत आलेल्या असून त्यामधील रहिवाशी पुनर्विकासाच्या प्रतिक्षेत असलेचे निदर्शनास येत आहे. सदर प्रकल्पासंदर्भात शासनाने महाअधिवक्ता यांचे अभिमत अपेक्षिलेले आहे. मा.महाअधिवक्ता यांचे अभिमत प्राप्त झालेनंतर या प्रकल्पांसदर्भात पुढील निर्णय शासनाकडून संकल्पित आहे.

म्हाडाकडील प्रकल्पासंदर्भात म्हाडाने संपादित केलेल्या साने गुरुजी मार्गावरील नळावाला चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पासंदर्भात कार्यवाही ही शासनाच्या दिनांक ४.१२.२०१३ रोजीच्या निदेशापूर्वी सुरु असलेचे दिसून येते. या प्रकल्पाच्या पुनर्विकास प्रस्तावाच्या नकाशांना महानगरपालिकेकडून दिनांक ३०.५.२०१७ रोजी मंजूरी देणेत आलेली आहे. स्थायी सल्लागार समितीची मंजूरी घेणेची कार्यवाही म्हाडाकडून सुरु आहे. सद्यस्थितीत उपकर प्राप्त इमारती तोडण्यात आलेल्या असून, पुनर्विकासाच्या प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात झालेली नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिका हद्दीत उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवर्स कंपन्यांकडे कोट्यवधी रुपयांची असलेली थकबाकी

**(६८) * १००४१८ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका हद्दीतील २६८९ मोबाईल टॉवर्स उभारलेल्या संदर्भात मोबाईल कंपन्यांकडे महानगरपालिकेची ४५२ कोटी रुपयाची थकबाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टॉवर्स उभारणाऱ्या ६ ते ७ कंपन्याच्या वतीने न्यायालयात दावा दाखल केला असता न्यायालयाने अनधिकृत मालमत्तेवर उभ्या असलेल्या टॉवर्सवर कारवाई करण्याबाबत व थकबाकी वसूल करण्याबाबत निर्देश दिला असताना पुणे महानगरपालिकेने अद्याप कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपन्यांकडून टॉवर्सची थकबाकी वसूल करण्याकरिता समिती स्थापन करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ४५२ कोटी रुपयांची थकबाकी वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याची सद्यस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिका हद्दीतील २३०५ मोबाईल टॉवर्स कंपन्यांकडे ४७० कोटी रूपयांची थकबाकी आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) • मोबाईल टॉवर्स कंपन्यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.२०४७/२०१४ व क्र.२०४३/२०१४ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने अनधिकृत मोबाईल टॉवरबाबत कोणतीही विपरीत/बळजबरी कारवाई करू नये, तसेच टॉवर्सच्या साईट सिल करू नये असे आदेश दिले आहेत.

• त्यामुळे अनधिकृत मोबाईल टॉवर बांधकामावर कारवाई करणे शक्य होत नाही.

• तसेच मिळकत कराच्या आकारणी बाबत मोबाईल टॉवर्स कंपन्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल केला होता.

• मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१६.१२.२०१६ रोजी सर्व संबंधित महानगरपालिका /नगरपालिकांना त्यांच्या हद्दीमध्ये असलेल्या मोबाईल टॉवर्सवर मिळकत कर आकारता येईल असे आदेश दिले आहेत.

• त्यास अनुसरून पुणे महानगरपालिकेमार्फत मिळकत कराची थकबाकी वसूलीसाठी कारवाई केलेली आहे. तथापि, या कारवाई विरोधात संबंधीत कंपन्यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.२६७८/२०१७ दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने दि.३.३.२०१७ च्या आदेशान्वये स्थगिती दिली आहे. सद्य:स्थितीत प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे मोबाईल टॉवर्सवरील थकबाकी वसूलीबाबत कारवाई करता आली नाही.

(३) मोबाईल टॉवर्सच्या मालमत्ता कराच्या थकबाकी वसूलीसाठी समिती स्थापन करावी अशी बातमी दि.२३.०९.२०१७ च्या दै.लोकमत या वृत्तपत्रामध्ये आलेली होती.

(४) पुणे महानगरपालिकेमार्फत मिळकत कराची थकबाकी वसूलीसाठी नोटीस देणे, जप्तीचे वारंट देणे, काही कंपन्यांचे ऑफीस सिल करणे अशा कारवाई करण्यात आलेली आहे. तथापि, या कारवाई विरोधात संबंधीत कंपन्यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.२६७८/२०१७ दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने दि.३.३.२०१७ च्या आदेशान्वये स्थगिती दिली आहे. सद्य:स्थितीत प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे मोबाईल टॉवर्सवरील थकबाकी वसूलीबाबत पुढील कार्यवाही करता आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील महिला कॉन्स्टेबलने आत्महत्या केल्याबाबत

**(६९) * ९७८८२ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील सुभद्रा पवार या महिला कॉन्स्टेबलने सहाय्यक पोलीस आयुक्त शाम निपुंगे यांच्या जाचाला कंटाळून दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी ठाण्यातील कळवा पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी कळवा पोलीस स्टेशन,ठाणे येथे गु. र.क्र. २९०/२०१७, भा.दं.वि. कलम ३०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. नमुद गुन्ह्यात एका आरोपीस मा. उच्च न्यायालयाने अटकपुर्व जामीन मंजुर केला असुन एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ च्या प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(७०) * ९५६५४ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ च्या कामासाठी गिरगांव आणि काळबादेवी येथील १९ इमारतीची जागा लागणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या इमारतीमधील किती निवासी व व्यावसायिक गाळे बाधित होणार आहेत तसेच या बाधित होणाऱ्या इमारतींचा डीसीआर ३३(७) नुसार पुनर्विकास कुठे केला जाणार आहे,

(३) असल्यास, दक्षिण मुंबईतील मेट्रो-३ च्या बांधकामामुळे विस्थापीत झालेल्या व होणाऱ्या उपरोक्त गाळेधारकांना पुरेसा मोबदला मिळत नसल्याचेही दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) खरे आहे.
(२) सदर बाधित इमारतीमध्ये २७८ निवासी सदनिका व ३४५ व्यावसायिक गाळे बाधित होत आहेत. गिरगांव आणि काळबादेवी येथील बाधित इमारतींचा पुनर्विकास विकास नियंत्रण नियमावलीच्या (डीसीआर) कलम ३३(७) नुसार त्याच जागेवर समूह विकासाद्वारे केला जाणार आहे.
(३) अंशतः खरे आहे.
(४) व (५) मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. मार्फत चालू बाजार भावानुसार भाडे देण्याचे निश्चित केले असून प्रकल्पग्रस्तांच्या मागणी नुसार माहे एप्रिल २०१७ मध्ये भाड्यात वाढ देखील केलेली आहे. सदर भाड्यामध्ये प्रतिवर्षी १०% वाढ करण्याचे देखील मान्य करण्यात आलेले आहे.

-----------------

## मुंबईतील गिरणी कामगारांना सन २०१२ मध्ये म्हाडाच्यावतीने वाटप करण्यात आलेल्या घरांमध्ये पायाभूत सुविधा नसल्याबाबत

**(७१) * ९५१३८ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती**

**ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गिरणी कामगारांना सन २०१२ मध्ये म्हाडाच्यावतीने ६९२३ घरांचे वाटप करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची घरे लहान आकाराची असून तेथे पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे, प्रॉपर्टी टॅक्स कमी करणे, लिजवर दिलेली घरांची जमीन गृहनिर्माण संस्थेच्या नावावर करणे व सेवा शुल्कापोटी घेतलेली अतिरिक्त रक्कम बँक खात्यावर जमा करणे इत्यादी मागण्यांबाबत म्हाडाकडे तक्रारी करुनही कार्यवाही न झाल्यामुळे दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मुंबईच्या वांद्रे येथील म्हाडा कार्यालयावर गिरणी कामगार रहिवाश्यांनी मोर्चा काढून निवेदन सादर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनामधील मागण्यांनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) म्हाडाच्या अहवालानुसार गिरणी कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या एकूण १८ गिरण्यांमधील ६९२५ सदनिकांची दि. २८.०६.२०१२ रोजी सोडत काढण्यात आली. त्यापैकी ६४१३ सदनिकांचे वितरण करण्यात आलेले आहे.

(२) व (३) हे खरे आहे. सदर निवेदनातील प्रॉप्रर्टी टॅक्स कमी करणे, लिजवर दिलेली घरांची जमिन गृहनिर्माण संस्थेच्या नावावर करणे इ. धोरणात्मक बाबींसंदर्भात म्हाडाने नगर विकास विभागाकडे दि. २१.०९.२०१७ रोजी पत्र पाठविले आहे.

विकास नियंत्रण नियमावली ५८(१) (ब) नुसार गिरणी कामगारांसाठी बांधण्यात आलेली घरे २०.९० चौ.मी (२२५ चौ. फुट) चटई क्षेत्राची आहेत. गिरणी निहाय नस्तींची तपासणी केल्यानंतर सेवाशुल्कापोटी जर अतिरिक्त रक्कम घेतली असल्यास सदर रक्कमेचा परतावा करण्यात येईल असे म्हाडाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांद्रे (मुंबई) रेल्वे स्थानकाच्या पुर्वेकडे लोहमार्गालगत असलेल्या गरीबनगर झोपडपट्टीस लागलेल्या आगीबाबत

**(७२) * ९५३५२ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) रेल्वे स्थानकाच्या पुर्वेकडे लोहमार्गालगत असलेल्या गरीबनगर झोपडपट्टीस दिनांक २६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या आगीत शंभरहून अधिक झोपड्या जळाल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आग आटोक्यात आणताना अग्निशमन दलाचे दोन जवान जखमी झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आगीत जीवित व मनुष्य हानी झाली आहे काय,

(४) असल्यास, या घटनेची संपूर्ण चौकशी करण्यात आली आहे काय, त्याचा तपशील काय आहे,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

सदर आगीत निवासी ३२४ झोपडया व ४९ दुकानांचे नुकसान झाले आहे.

(२) आग आटोक्यात आणतांना अग्निशमन दलाचे तीन जवान व एक अधिकारी असे एकूण ४ जण जखमी झाले होते.

(३) नाही.

(४) व (५) सदर आगीबाबत निर्मलनगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३६३/१७, भा.दं.वि. कलम ४३६, ४२६, ३३६, ३३७, १२०-ब, सह सार्वजनिक संपत्ती हानी प्रतिबंधक अधिनियम, १९८४ चे कलम ४ व रेल्वे अधिनियम, १९८९ चे कलम १५१ प्रमाणे दिनांक २७.१०.२०१७ रोजी गुन्हा नोंदविण्यांत आला आहे.

सदर गुन्हयातील आग लावणाऱ्या आरोपीस अटक करण्यांत आली असून तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. तसेच फरार आरोपी व त्यांचे इतर साथीदार यांचा शोध सुरु आहे.

आगीत नुकसान झालेल्या ३२४ झोपडयांसाठी सानुग्रह अनुदान वाटप जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेमार्फत करण्यांत आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या ई-२ विभागांतर्गत काळाचौकी, नागपाडा, भायखळा, मदनपूरा, आग्रीपाडा, सातरस्ता इ.परिसरातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(७३) * ९५०७५ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या ई-२, विभागांतर्गत काळाचौकी, नागपाडा, भायखळा, मदनपूरा, आग्रीपाडा, सातरस्ता इत्यादी परिसरातील उपकरप्राप्त इमारतींची दुरुस्ती करण्याकरिता माहे मार्च ते जुलै, २०१७ या काळात सुमारे ८ ते ९ कोटी रुपयांची बनावट देयके तयार करुन ती विभागाला सादर करुन म्हाडाची फसवणूक करणाऱ्या संबंधित कार्यकारी अभियंता व अधिकाऱ्यांची चौकशी करण्याकरीता दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ व दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास एक त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या नागरिकांच्या तक्रारीवरुन हे प्रकरण निदर्शनास आले त्यांनी यापूर्वीही वारंवार तक्रारी केल्या होत्या परंतू त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात खेरवाडी पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आलेल्या गुन्हयामध्ये म्हाडाने केलेल्या तक्रारीत कोणकोणत्या बाबींचा समावेश प्रामुख्याने करण्यात आला आहे,
(४) असल्यास, संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द एसीबीकडे तक्रार करुन ज्ञात स्त्रोतापेक्षा जास्त संपत्ती या अधिकाऱ्यांनी जमवली आहे किंवा नाही याचा तपास न करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने बडतर्फ न करता त्यांना अद्यापी सेवेत ठेवण्याचा निर्णय घेणाऱ्या संबंधीत दोषी अधिकाऱ्यांविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे अशंत: खरे आहे.

कार्यकारी अभिंयता/ई-२ विभाग, दुवपु मंडळ या विभागातील विशेष दुरुस्ती व चालु दुरुस्तीची मार्च २०१७ ते जुन २०१७ पर्यंतच्या ९२६ देयकांबाबत सदर प्रकरण असून या प्रकरणी श्री.भरत गुर्जर यांनी मंडळाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर ९२६ देयकांची सखोल चौकशी करण्यासाठी मुख्य अधिकारी, पुणे मंडळ व श्री.के.एल.काटवटे, कार्यकारी अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण कक्ष/प्राधिकरण यांची व्दिसदस्यीय समिती उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांचे आदेश क्र.प्राधि/खाचौ/२०१७/३६९५/प्र-९, दि.३१.०८.२०१७ अन्वये स्थापन करण्यात आलेली आहे.
(२) नाही, या कार्यालयाकडे या प्रकरणी यापूर्वी कुठलीही तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचे अभिलेखावरुन दिसून येत नाही.
(३) या प्रकरणी खेरवाडी पोलीस ठाण्यात कोणताही गुन्हा नोंदविण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) व्दिसदस्यीय समितीमार्फत वरील प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी प्रगतीपथावर असून, अहवाल अप्राप्त आहे.

(७) प्रश्न उद्‌भ्वत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) महानगरपालिका हद्दीत सिडकोने विकसित केलेल्या नविन पनवेल विभागात डेंग्युचा वाढता प्रादुर्भाव

**(७४) * ९७२१० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका (जि.रायगड) हद्दीत सिडकोने विकसित केलेल्या नविन पनवेल विभागात डेंग्युचे १८० रूग्ण व ३०० संशयित रूग्ण आढळल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदशर्नास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको व्यवस्थापनाकडून कोणतेही प्रतिबंधक उपाय करण्यात येत नसल्यामुळे उक्त वसाहतीत डेंग्युची लागण झालेल्या रूग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय यंत्रणा कमी पडत असल्यामुळे रूग्णांना उपचारासाठी न परवडणाऱ्या खाजगी रूग्णालयात उपचार घ्यावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून डेंग्यूचा प्रभाव कमी करण्याबाबत व रूग्णांवर तातडीने उपचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सिडकोने विकसीत केलेल्या नवीन पनवेल विभागात ऑक्टोबर,२०१७ मध्ये डेग्युचे रुग्ण आढळून आलेले नाहीत तथापि डेंग्यु सदृष्य तापाचे एकूण ४३ संशयीत रुग्ण आढळून आले आहेत.

(२), (३) व (४) सिडको, व्यवस्थापनाकडून कंटेनरचे सर्व्हेक्षण, ताप सदृश्य रुग्णांचे सर्वेक्षण, डास प्रतिबंधात्मक फवारणी, डास नाशकांचे धुरीकरण इत्यादी डेंग्यु / हिवताप प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत.

तसेच, माहे जून, २०१७ ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत डेंग्यु सदृष्य तापाच्या रुग्णांवर सिडकोच्या खारघर, कंळबोली, नवीन पनवेल व उलवे नोडमधील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण रुग्णालय, पनवेल येथे रुग्णांची मोफत तपासणी व औषधोपचार करण्यात आले असून सिडकोकडून डेंग्यु प्रतिबंधासाठी जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खिंडसी (जि.नागपूर) येथील रामटेक परिसरात “हॉटेल ग्रीन लँड” येथे सुरु असलेला देहव्यापार

**(७५) * १००४१४ श्री.विजय काळे (शिवाजीनगर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या रामटेकजवळील (जि.नागपूर) खिंडसीच्या ‘हॉटेल ग्रीन लँड’ मध्ये उपराजधानीतील वारांगनांना देहव्यापार करताना रामटेक पोलिसांनी दिनांक २५ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या रिसॉर्टची तसेच पर्यटन व साहसी क्रीडा प्रशिक्षण केंद्राच्या रिसॉर्टची जबाबदारी कंत्राटदाराकडे सोपविण्यात आल्याने महामंडळाचे कामकाज अवैध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देहव्यापाराच्या या प्रकरणात अनैतिक देहव्यापार कायदा (पिटा)अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दि.२३.०८.२०१७ रोजी अटक करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

पर्यटन वृध्दी व वाढीसाठी महामंडळाच्या मालमत्ता भाडेपट्ट्यावर देण्याचे शासनाचे १९९३,१९९५ मधील धोरण त्यामध्ये विहीत केलेल्या अटी व शर्तीनूसार मालमत्ता ई-निविदा प्रक्रीये मार्फत भाडेपट्ट्यावर विहीत कार्यपध्दती अवलंबून संबधितांना देण्यात येतात.

त्यानुसार मा.संचालक मंडळाच्या दि.१९/९/२०१६ रोजीच्या बैठकीतील १४९/२० ठरावा नुसार हॉटेल ग्रीन लॅड (मे.साईप्रसाद रेस्टॉरंट) यांनी सादर केलेल्या उच्चतम देयकास मान्यता देऊन १० वर्षाच्या कालावधीकरीता रितसर ताबा त्यांना दिनांक १/१२/२०१६ रोजी देण्यात आलेला आहे.

(३) होय.

(४) होय.

फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून रामटेक पो. स्टे. अप.क्र.४९७/२०१७ कलम ३,४,५ व ७ अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ अन्वये गुन्हा दाखल करून १३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.